रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ६१ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. ६ ऑगस्ट २०२५

किंमत ४ ₹


## यंदा 'आनंदाचा शिधा' नाही!

**मुंबई :** लाडकी बहीण योजनेचा फटका आता आनंदाचा शिधा योजनेला बसणार असून, यंदा गणेशोत्सवात आनंदाचा शिधा मिळणार नाही. लाडकी बहीण योजनेसाठी ४५ हजार कोटी रुपये द्यावे लागणार असल्याने आनंदाचा शिधा देऊ शकत नाही, असे राज्याचे अन्न पुरवठा मंत्री छगन भुजबळ म्हणाले. सणासुदीच्या काळात राज्यातील गरीबांना केवळ १०० रुपयांमध्ये चार वस्तू या योजनेच्या माध्यमातून देण्यात येतात. राज्यातील तिजोरीतील ४५ हजार कोटी रुपये लाडकी बहीण योजनेसाठी द्यावे लागणार आहेत. त्यामुळे त्याचा परिणाम इतर योजनांवर थोडा-थोडा होत असल्याचं छगन भुजबळांनी कबूल केलं.

## दिवाळीनंतरच निवडणुकांचा बार

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना अखेर मुहूर्त

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका दिवाळीनंतर म्हणजेच डिसेंबर-जानेवारीमध्ये होणार आहेत, अशी माहिती राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली आहे. आगामी निवडणुकीचा आढावा घेण्यासाठी नाशिकसह उत्तर महाराष्ट्रातील प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्यात आली. या बैठकीनंतर निवडणूक आयुक्तांनी पत्रकार परिषद घेत निवडणूकपूर्व तयारीची माहिती दिली. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बार दिवाळीनंतर फुटणार हे निश्चित झाल्याने पुढील काळात राजकीय वातावरण तापणार आहे.

राज्य निवडणूक आयोगामार्फत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये विभागीय बैठक घेण्यात आली. यात नंदुरबार, जळगाव, धुळे, नाशिक,

पान २ वर

### मुंबईमध्ये जुन्याच प्रभागानुसार निवडणुका



मुंबईमध्ये जुन्याच प्रभागानुसार निवडणुका होणार आहेत. त्यानुसार मुंबई महानगरपालिकेमध्ये २२७ एक सदस्यीय प्रभाग रचना करण्यात येणार आहे. तर पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, नवी मुंबई, पिंपरी चिंचवड, छत्रपती संभाजीनगर, यासह इतर सर्व महापालिकांमध्ये चार सदस्यांचे प्रभाग असणार आहेत.मुंबईमध्ये आधीही २२७ प्रभाग होते. महाविकास आघाडीचे सरकारआल्यानंतर त्यामध्ये वाढ होऊन २३६ प्रभाग करण्यात आले होते. पुन्हा महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर २२७ प्रभाग करण्यात आले. त्यास सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. परंतु, ती याचिका फेटाळण्यात आली. त्यामुळे मुंबईमध्ये आता २२७ प्रभाग असणार आहेत.

## वेधक

### सत्यपाल मलिक यांचे निधन

**दिल्ली :** जम्मू आणि काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचे मंगळवारी (दि. ५) वयाच्या ७९ व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. दुपारी १ वाजता नवी दिल्लीतील राम मनोहर लोहिया रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. मलिक यांनी ऑगस्ट २०१८ ते ऑक्टोबर २०१९ पर्यंत जम्मू आणि काश्मीर राज्याचे शेवटचे राज्यपाल म्हणून काम पाहिले. त्यांच्याच कार्यकाळात ५ ऑगस्ट २०१९ रोजी कलम ३७० रद्द करण्यात आले आणि राज्याचा विशेष दर्जा रद्द करण्यात आला.

### '.. तोपर्यंत फेटा बांधणार नाही'

**बीड :** मराठा आरक्षण लढ्यातील विजय मिळवल्याशिवाय आपण फेटा बांधणार नाही, अशी शपथ मराठा आरक्षण आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील यांनी घेतली आहे. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी २९ ऑगस्टला मुंबईला धडक देण्याची तयारी सुरु केली आहे. या आंदोलनात आता माघार घेतली जाणार नाही, अशी भूमिका त्यांनी घेतली होती. आता आपण मराठा आरक्षण मिळवूनच स्वस्थ बसणार असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

# शासनाचा पगार, 'खासगी'त उपचार

### रुग्णालयांतील डॉक्टराच्या प्रतापाची चर्चा



प्रमोद जाधव

**। अलिबाग ।**

**'पगार शासनाचा, उपचार मात्र खासगीत' अशी अवस्था अलिबागसह जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयांतील डॉक्टरांची असून, त्यामुळे आरोग्याचा बोजवारा उडाला आहे. रुग्णालयाच्या नावाखाली डॉक्टर रुग्णालयात जात नाहीत. त्यामुळे रुग्णालयांचा दर्जा ढासळला असल्याने जनतेतून खदखद व्यक्त होत आहे. रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना चांगली सेवा मिळावी, म्हणून काही कंत्राटी स्वरुपात डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र, यातील काही डॉक्टर मानधन शासनाचे घेत असले, तरी त्यांचे रुग्ण खासगी दवाखान्यात उपचार घेत असल्याची चर्चा सध्या जोरात सुरु आहे. रुग्णालयातील या कारभाराबाबत चर्चेला उधाण आले आहे. जिल्हा शल्यचिकित्सक अशा डॉक्टरांच्या कारभाराबाबत काय भूमिका घेणार याकडे लक्ष लागून राहिले आहे.**

> **जिल्हा रुग्णालयासह इतर रुग्णालयांमध्ये कंत्राटी डॉक्टरांची नियुक्ती केली आहे. जे कोणी डॉक्टर मानधन घेऊन काम करीत नसतील, त्यांच्याविरोधात कारवाई केली जाईल. पाहणी करून कार्यवाही करण्यात येईल.**
>
> **- डॉ. निशिकांत पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक**

सर्वसामान्य रुग्णांना चांगली सेवा मिळावी, यासाठी रायगड जिल्ह्यात अलिबागमध्ये जिल्हा सामान्य रुग्णालय, पेण, मुरूड, कर्जत, पेण, माणगाव, रोहा, श्रीवर्धन आदी तालुक्यांमध्ये उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालय बांधण्यात आले. अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालय २५० खाटांचे आहे. पोलादपूरच्या टोकापासून पनवेल, श्रीवर्धन अशा अनेक भागांतून रुग्ण उपचारासाठी येतात. रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे कार्यरत डॉक्टरांना उपचार करताना अडचणी निर्माण झाल्या. अलिबागमधील जिल्हा रुग्णालयासह ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयात कंत्राटी

पान २ वर

### क्ष-किरण तज्ज्ञ अडचणीत

**अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या एका रुग्णाला रुग्णालयातील डॉक्टरांकडून दुय्यम वागणूक देण्यात आली असून, त्यांना धमकाविण्यात आले असल्याचा आरोप करण्यात आला आहे. याबाबत त्यांच्याविरोधात तक्रार करण्यात आली आहे. या तक्रारीची दखल घेण्यात आली असून, लेखी स्वरुपात खुलासा मागविण्यात आला आहे. गैरवर्तन केलेले निदर्शनास आल्यास त्यांच्याविरोधात कारवाई केली जाणार असल्याची माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांनी दिली. त्यामुळे रेडिओलॉजिस्ट तथा क्ष-किरण तज्ज्ञ अडचणीत येण्याची शक्यता आहे.**

## उत्तरकाशीत ढगफुटी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली गावात ढगफुटीमुळे हाहाकार उडाला. मंगळवारी (दि. ५) दुपारी १.४५ वाजता उत्तरकाशीतील हर्सिल येथील भारतीय लष्कराच्या कॅम्पपासून सुमारे ४ किमी अंतरावर धरालीत ढगफुटी झाली. यामुळे भूस्खलन होऊन किमान चार जणांचा मृत्यू झाला. तर, सुमारे ५० लोक बेपत्ता आहेत. आर्मी आणि एनडीआरएफ पथके बचावकार्यासाठी तात्काळ घटनास्थळी रवाना झाली असून, युद्धपातळीवर कार्य सुरू आहे.

## 'कृषीवल'च्या दणक्याने आरसीएफकडून खताचा पुरवठा

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील शेतकऱ्यांना ऐन खरीप हंगामातच खताची टंचाई भासत आहे. शेतकऱ्यांना खत कंपनी व्यवस्थापन मागणी केलेल्या युरिया खताचा पुरवठा करत नसल्यामुळे शेतकऱ्यांची पिकांना खताची मात्रा देण्याची कामे खोळंबली होती. मात्र, 'कृषीवल'ने खताच्या टंचाईचे वृत्त सोमवारी (दि.४) ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करताच तालुक्यातील विंधणे येथे सोमवारी (दि.५) ऑगस्ट रोजी २५ टन युरिया खताची गाडी उपलब्ध झाल्याची माहिती कृषी विभागाचे एस.जी. गटकळ यांनी दिली. त्याचबरोबर दोन-तीन दिवसात आणखी ५० टन युरिया



खत उरणमधील शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून दिले जाणार असल्याचेही

पान २ वर

> **आरसीएफ कंपनीकडे खताचा मुबलक साठा आहे. परंतु, जोपर्यंत मागणी होत नाही, तोपर्यंत पुरवठा करता येत नाही. कोणत्या तालुक्यात किती खताची आवश्यकता आहे, ती माहिती पुरविण्याची तसेच आमच्याकडे मागणी करण्याची जबाबदारी संबंधित कृषी विभागाची आहे. त्यांच्याकडून जशी मागणी होईल, तेवढाच पुरवठा आरसीएफ कंपनीकडून करण्यात येईल.**
>
> **- रोहन वर्तक, वरिष्ठ अभियंता, विपणन विभाग, आरसीएफ**




# घोटवडे पूल धोकादायक

## अवजड वाहतुकीमुळे चिंता वाढली

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

सुधागड तालुक्यातील घोटवडे येथील अंबा नदी पूल जीर्ण व धोकादायक झाला आहे. घोटवडे व इतर गाव तसेच आदिवासी वाड्या-वस्त्यांना जोडणाऱ्या तसेच वाहतूक व दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेला या पुलावरून होणाऱ्या अवजड वाहतुकीमुळे चिंता वाढली आहे. शेजारीच सुरु असलेल्या नव्या पुलाचे बांधकाम मात्र खोळंबले आहे. येथील नवीन पुलाचे काम खोळंबले आहे. त्यामुळे नवीन पूल वाहतुकीस सुरु होईपर्यंत ग्रामस्थ व वाहनांना सध्या या जीर्ण पुलावरूनच धोकादायकपणे प्रवास करावा लागत आहे.

रायगड जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असलेल्या ४५ मीटर लांबी व ५ मीटर रुंदीच्या घोटवडे पुलाचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग पाली सुधागडच्या माध्यमातून सन १९९१ साली करण्यात आले होते. तालुक्यातील इतर गावांना व आदिवासीवाड्यांना जोडणारा हा पूल वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र, हा पूल अखेरची घटका मोजताना दिसत आहे.

(छायाचित्र : धम्मशील सावंत)



- नव्या पुलाचे बांधकाम खोळंबले
- नागरिक भयभीत

### अखेरची मोजतोय घटका

जुना जर्जर व मोडकळीस आलेला हा धोकादायक पूल पूर्णपणे वाकला असून, हा पूल केव्हाही कोसळून खूप मोठी दुर्घटना होण्याची दाट भीती निर्माण झाली आहे. या पुलावरून अवजड वाहने गेल्यास पूल हलू लागतो. संरक्षण कठडे तुटल्याने वाहने नदीत कोसळून अपघात होण्याची भीती आहे. पावसाळ्यात तर या पुलावर धोक्याची घंटा वाजत आहे. कमकुवत झालेल्या या पुलावरुन जीव मुठीत घेऊन प्रवास करण्याची वेळ आली आहे.

> या पुलाच्या बाजूला नवीन पुलाचे बांधकाम सुरु आहे. परंतु, यावर्षी लवकर आलेल्या पावसामुळे ते काम पूर्ण झाले नाही. त्यामुळे लोकांना व ग्रामस्थांना या जुन्या धोकादायक पुलावरूनच ये-जा करावी लागते. परंतु, काही राजकारणी व स्थानिक कॉन्ट्रॅटर यांची अवजड वाहने मोठ्या प्रमाणात या पुलावरून डबर वाहतूक करतात. त्यामुळे काही दुर्घटना घडली तर याला जबाबदार कोणाला धरायचे. त्यामुळे प्रशासनाने वेळीच याकडे लक्ष घालून ही अवजड वाहतूक बंद करावी.
>
> – महेश झोरे, सामाजिक कार्यकर्ते, घोटवडे-सुधागड

# पीक विमा योजनेस मुदतवाढ

| रायगड | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यात भात व नाचणी पिके अधिसूचित असून, या योजनेत सहभागाची अंतिम मुदत दि.३१ जुलै अशी निश्चित करण्यात आलेली होती. शेतकऱ्यांना या योजनेत सहभागी होण्यासाठी येणाऱ्या प्रशासकीय व तांत्रिक अडचणी विचारात घेऊन योजनेत सहभागासाठी पुरेसा कालावधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत खरीप हंगाम २०२५ मध्ये ऑनलाईन विमा अर्ज भरण्यास बिगर कर्जदार शेतकऱ्यांना दि. १४ ऑगस्टपर्यंत व कर्जदार शेतकऱ्यांना दि. ३० ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून, सर्व शेतकऱ्यांनी योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी केले आहे. पीक विमा योजना खरीप व रब्बी २०२५-२६ या एक वर्षाकरिता अधिसूचित पिकांसाठी विमा क्षेत्र घटक धरुन राबवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.


### जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली सदनिका मिळकत तिचे मालक श्री. उम्मीद अली अशीक अली अन्सारी यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या सदनिका मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे बोपेले, ता.कर्जत, जि.रायगड.**

**मौजे बोपेले, ता.कर्जत, जि.रायगड येथील सर्व्हे नं.६३, प्लॉट नं. ३ ते ५ यावरील लक्ष्मी कॅस्टेलो या ईमारती मधील डी विंग मधील सातव्या मजल्यावरील सदनिका नं. ७१२, क्षेत्र १७.९८८ चौ. मी. कारपेट, सी.बी. क्षेत्र १.०१३ चौ. मी, बाल्कनी क्षेत्र २.७७५ चौ.मी. टेरेस क्षेत्र ४.५७९ चौ.मी**

तरी, वर वर्णन केलेल्या सदनिका मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल करारनामा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ०५/०८/२०२५

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३


# सिद्धांत सेवा संस्थेमार्फत बेलापुरात वृक्षारोपण

| नवी मुंबई | प्रतिनिधी |

'झाडे लावा-झाडे जगवा' या अभियानांतर्गत सिद्धांत सेवा संस्थेच्यावतीने बिरोबा मंदिर, बेलापूर येथील परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी वृक्षारोपण करून वृक्षसंवर्धन करण्याचा संकल्प संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केला.

या कार्यक्रमासाठी माजी सहाय्यक आयुक्त रमेश चक्रे, माजी नगरसेवक अशोक गुरखे, राज्य परिवहन अधिकारी अरुण निकम, प्रसाद साटम, शशिकांत गोरड, संजय पाथरे, अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष महादेव अर्जुन, पोलीस अधिकारी (नि.) पांडुरंग गावडे, उद्योगपती देवाप्पा लवटे आदी मान्यवर उपस्थित होते.

गेल्या १६ वर्षांपासून सिद्धांत सेवा संस्थेच्या माध्यमातून समाजोपयोगी विविध उपक्रम राबविले जात असून, पर्यावरणपूरक वृक्षारोपण हा त्यातीलच एक महत्त्वाचा घटक आहे. गेल्या सात वर्षांमध्ये सातत्याने विविध भागांमध्ये वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन हा उपक्रम राबवताना आत्तापर्यंत साधारण ९०० झाडांची रोपं लावली आहेत. त्यातील सुमारे ६० टक्के झाडे जिवंत ठेवण्यात त्यांना यश मिळाले आहे, अशी माहिती संस्थेचे सचिव



मिलिंद जाधव यांनी दिली. यावेळी रमेश चक्रे यांना महाराष्ट्र शासनाने सामाजिक क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार देऊन गौरविल्याबद्दल सिद्धांत सेवा संस्थेच्या वतीने त्यांना विशेष सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष विजय कोळी, उपाध्यक्ष शशिकांत गोरड राजमाता अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठान, सानपाडा व बिरोबा देवस्थान समिती, बेलापूर यांचे विशेष सहकार्य मिळाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गजानन गायकवाड, विनायक यादव, महावीर उरुणकर, अरुण दुश्मिकर, किरण साळवी, दिनेश कदम, विशाल वाघमारे यांनी परिश्रम घेतले.

# पनवेल-उरण एसटी बससेवेचा बोजवारा

- कर्मचाऱ्यांची उर्मट वर्तणूक, प्रवाशांची प्रचंड गैरसोय

| उरण | प्रतिनिधी |

पनवेल ते उरणदरम्यान धावणारी एसटी बससेवा ही प्रवाशांसाठी डोकेदुखी ठरत आहे. दररोज दोन ते तीन तास बसचं कोणतंच ठोस वेळापत्रक नसल्यानं प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. या गंभीर परिस्थितीकडे प्रशासन आणि लोकप्रतिनिधी पूर्णतः दुर्लक्ष करत आहेत.

पनवेल बसस्थानकावर प्रवाशांसाठी ना योग्य प्रतीक्षागृह, ना माहिती फलक, ना शेड. उरण डेपोमध्ये विचारणा केल्यास कर्मचाऱ्यांकडून उर्मट भाषा आणि मनमानी कारभाराचं चित्र दिसून येत आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून पनवेल-उरण मार्गावरच्या बस सेवेतील हा गोंधळ सुरू असून, अद्याप कोणतीही ठोस सुधारणा झाली नाही. स्थानिक प्रवाशांचा संयम सुटू लागला आहे. ''दैनंदिन प्रवास करणाऱ्यांची ही ससेहोलपट आमदार, खासदार किंवा एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या लक्षात कधी येणार?'' ही विचारण्याची वेळ आता आली आहे. प्रवाशांच्यावतीने एसटी प्रशासनास तात्काळ सुधारणा करण्याची मागणी करण्यात येत आहे.


### जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येत आहे की माझे अशील श्री. अशोक श्रीराम गवळी व श्रीमती सायली अशोक गवळी हे खालील अनुसूचीमध्ये विवरिणीत स्थावर मालमत्तेचे मालक असे नमूद करीत आहेत की त्यांच्याकडून ते खरेदीदार म्हणून व कैलाश विष्णू जगताप व अन्य विक्रेते यांच्या दरम्यान केलेला नोंदणीकरण क्र. कर्जत-२-१२३८-२०१४ धारक अभिहस्तांकन करार दि. १९.११.२०१४ हरवला/गहाळ झाला आहे.

त्यांनी यासंदर्भात दि. ०२ ऑगस्ट २०२५ रोजी अंबरनाथ पोलीस स्टेशन येते नोंदणीकृत आयडी एएमबी०४३ धारक पोलीस तक्रार केली आहे.

कोणाही व्यक्तीची वरील सदर मालमत्तेसंदर्भातील सदर गहाळ/हरवलेल्या अभिहस्तांकन करारासंदर्भात कोणताही हरकत वा हीतसंबंध वा हक्क वा कोणताही दावा असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत लिखित स्वरुपात त्यांची हरकत दाखल करावी व खालील पत्त्यावर पाठवावी. सदर सूचनेच्या प्रसिध्दी दिनांकापासून १५ दिवसांच्या आत कोणताही दावा व हरकत प्राप्त न झाल्यास, वरील निर्देशित मूळ अभिहस्तांकन करार हरवला/गहाळ झाला आहे असे समजण्यात येईल व मालकांचे खालील अनुसूचीत विवरिणीत सदर मालमत्तेवर हस्तांतरणयोग्य हक्क असतील.

**मालमत्तेची अनुसूची**

मालमत्ता विवरण नवीन सर्व्हे क्र. ६२ (जुना सर्व्हे क्र. १२४), हिस्सा क्र. १ए १, गाव अंभेरपाडा, तालुका कर्जत, जिल्हा रायगड, क्षेत्र मोजमापित १-००-०० एच.आर. एकुण क्षेत्र १-७१-५०, आकार ३-८३ पैकी.

सही/-
अनिकेत नेरुरकर (वकील)
१००४, १० वा मजला, रॉयल हेरिटेज, जुहू सर्कल जवळ, न्यू. डी. एन. नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५३.



### जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे माले, ता.कर्जत, जि.रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|---|
| श्री.प्रकाश परशुराम फराड व इतर | ३९/९ | लिहुन देणार यांचे मालकीचे विकत देत असलेले क्षेत्र ००-२५-३३ हे.आर. | ०-१६ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ०५/०८/२०२५

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता.कर्जत, जि.रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३


# पत्रकार गणेश कोळींचा सत्कार

**पनवेल :** पत्रकार गणेश कोळी यांची कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेलच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल रायगड प्रेस क्लब संलग्न पनवेल तालुका प्रेस क्लब तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पनवेल तालुका प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे, उपाध्यक्षा तृप्ती पालकर, खजिनदार राकेश पितळे, सल्लागार संजय कदम, सुमंत नलावडे, अनिल भोळे, वर्षा कुलकर्णी, प्रतिक



वेदपाठक, लालचंद यादव आदी मान्यवर उपस्थित होते.

# डान्स बारची तोडफोड करणाऱ्या मनसैनिकांना जामीन

| पनवेल | प्रतिनिधी |

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शेकापच्या मेळाव्यातून भाषण करताना पनवेलमधील डान्सबारचा उल्लेख केला होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या रायगड जिल्ह्यात पनवेलमध्ये सर्वाधिक डान्सबार असल्याचं त्यांनी म्हटलं होतं. त्यानंतर, पनवेलमधील मनसे कार्यकर्त्यांनी येथील नाईड राईड डान्सबारची मध्यरात्री तोडफोड केली होती. या तोडफोडप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करुन आरोपींना अटक केली होती. मात्र, आता आरोपींना न्यायालयाने जामीन मंजूर केल्यानंतर त्यांची तुरुंगातून सुटका होत आहे.

राज ठाकरेंच्या शेकापच्या कार्यक्रमातील भाषणात पनवेलमधील डान्स बारचा उल्लेख आल्यानंतर आणि त्यांच्या इशारानंतर मनसे कार्यकर्त्यांनी पनवेल येथील नाईट रायटर या डान्स बारची तोडफोड केली होती. याप्रकरणी मनसेच्या २० ते २५ कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते. त्यातील आठ कार्यकर्त्यांना पनवेल तालुका पोलिसांकडून अटक करण्यात आली होती. त्यानंतर, आरोपींना पनवेल न्यायालयात हजर केले असता त्यांना जामीन मंजूर करण्यात आला आहे.


### जाहीर नोटीस

याद्वारे जाहीर नोटीस देण्यात येते की, माथेरान, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील भाडेपट्ट्याने प्रदान करण्यात आलेल्या शासकीय वारसनोंद/नुतनीकरण/हस्तांतरण/भोगवटादार वर्ग १ या करिता शशिकला चंद्रकांत शिंदे व प्रसन्ना चंद्रकांत शिंदे यांनी या कार्यालयात अर्ज दाखल केलेला आहे.

**भूखंडाचा तपशील**

| गावाचे नांव व तालुका | भूखंड क्रमांक | सिटी एस क्रमांक | क्षेत्र | सध्याचे पट्टेदाराचे नाव | मुदत संपण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| मौजे माथेरान, ता.कर्जत | माथेरान बाजार भूखंड क्रमांक बी.पी.८५ | ३७८ | ५१५.१० चौ.मी. | श्रीम.शशिकला चंद्रकांत शिंदे व प्रसन्ना चंद्रकांत शिंदे | ३१/७/१९८४ |

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, वरील भूखंडाबाबत वारसनोंद/नुतनीकरण/हस्तांतरण/भोगवटादार वर्ग १ इ.बाबत कोणाचीही हरकत असल्यास, सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा दिवसांत अशी हरकत अधीक्षक माथेरान, ता.कर्जत, जि.रायगड याजकडे आवश्यक कागदपत्रे /पुरावे यासह लेखी स्वरूपात सादर करणेत यावी. मुदतीत आलेल्या हरकती विचारात घेणेत येतील, याची नोंद घ्यावी.

सही/-
**(सुरेन्द्र ठाकूर)**
**अधिक्षक माथेरान**


## पान १ वरून

### दिवाळीनंतरच निवडणुकांचा बार

अहिल्यानगर या जिल्ह्यांचा आढावा घेण्यात आला. यात या निवडणुका दिवाळीनंतर होणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत व्हिव्हिपॅट मशीन वापरली जाणार नाही, निवडणुका टप्प्या-टप्प्यानं होणार आहेत, अशी माहितीही राज्य निवडणूक आयोगानं दिली आहे.

सोमवारी नव्या प्रभाग रचनेनुसार ओबीसी आरक्षणासह निवडणुकांना मंजुरी मिळाली होती. नव्या प्रभाग रचनेला आव्हान देणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायालयाकडून फेटाळण्यात आल्या होत्या. त्यामुळे आता आगानी निवडणूका नव्या प्रभाग रचनेनुसार ओबीसी आरक्षणासह घोण्यास मंजुरी मिळाली आहे.

राज्यातील महत्त्वाच्या माहापालिका नाशिक महापालिका, पिंपरी चिंचवड महापालिका, पुणे महापालिका, मुंबई महापालिका यांच्या प्रभाग रचनेमध्ये काही बदल करण्यात आले होते. मात्र नव्या प्रभाग रचनेला आव्हान देणाऱ्या काही याचिका कोर्टात सादर करण्यात आल्या होत्या, त्यामुळे आता राज्यात नव्या प्रभाग रचनेनुसार ओबीसी आरक्षणासह निवडणुका पार पडणार आहेत.

**या महानगरपालिकांसाठी चार सदस्यीय प्रभाग**

अ, ब आणि क वर्ग महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक चार सदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश जारी झाले आहेत. 'अ' वर्ग महानगरपालिका पुणे, नागपूर, 'ब' वर्ग महानगरपालिका ठाणे, नाशिक, पिंपरी-चिंचवड, 'क' वर्ग महानगरपालिका नवीमुंबई, वसई-विरार, छत्रपती संभाजी नगर, कल्याण-डोंबिवली.

### शासनाचा पगार, 'खासगी'त उपचार

डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली आहे. १६८ डॉक्टरांना कंत्राटी स्वरुपात भरती करण्यात आले. त्यात जिल्हा सामान्य रुग्णालयात २८ डॉक्टरांचा समावेश आहे. जिल्हा शल्यचिकित्सकांच्या देखरेखेखाली कारभार चालला जातो. शस्त्रक्रियेपासून वेगवेगळ्या उपचाराची माहिती घेऊन दर महिन्याला कंत्राटी डॉक्टरांना मानधन दिले जाते. मात्र, यातील काही डॉक्टर शस्त्रक्रियेपासून बाह्य रुग्ण कक्षातदेखील हजर नसल्याची चर्चा समोर आली आहे.

बाह्यरुग्ण कक्षामध्ये शिकाऊ डॉक्टर अथवा परिचारिकांमार्फत काम चालविले जात आहे. शस्त्रक्रियेसाठी डॉक्टर नसल्याची चर्चादेखील रुग्णालयांमध्ये सुरू आहे. रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना सरकारी दवाखान्यात उपचार न देता त्यांना खासगी डॉक्टर त्यांच्या खासगी दवाखान्यात बोलावून उपचार देत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. कंत्राटी डॉक्टरांच्या मानधनावर लाखो रुपये खर्च केले जातात. मानधन शासनाकडून घेत असताना काही डॉक्टर मात्र त्यांच्या खासगी दवाखान्यातून कारभार चालवित असल्याची माहिती समोर येत आहे.

जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना बाहेरील खासगी मेडिकलमधील औषधे लिहून दिल्याचा प्रकार मागील काही महिन्यांपूर्वी उघडकीस आला होता. हा गोरखधंदा स्थानिकांनी जिल्हा शल्यचिकित्सकांच्या निदर्शनास आणून दिला होता. आता शासनाचे मानधन घेऊन खासगी दवाखाना चालविणाऱ्या डॉक्टरांविरोधात यंत्रणा काय भूमिका घेणार याकडे लक्ष लागून राहिले आहे. या डॉक्टरांची नावे लवकरच उघड केली जाणार आहेत.

### 'कृषीवल'च्या दणक्याने आरसीएफकडून खताचा पुरवठा

ते म्हणाले. एकंदरीत, कृषीवलच्या वृत्ताचा दणका खत कंपनी व्यवस्थापनाला बसला असून, व्यवस्थापनाने या वृत्ताची दखल घेतली आहे. त्यामुळे शेतकरीवर्गात सध्या आनंदाचे वातावरण दिसून येत आहे.

रायगड जिल्ह्यातील थळ येथे खत निर्मितीसाठी आरसीएफचा कारखाना आहे. मात्र, कारखाना जिल्ह्यात अन् जिल्ह्यातच खताचा तुटवडा, अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती. उरण तालुक्यात तर ही खताची बोंबाबोंब दरवर्षीच आहे. मात्र, यावर्षी कृषीवलमध्ये खतटंचाईचे वृत्त प्रकाशित होताच आरसीएफ कंपनीने तालुक्यासाठी लागणारा खतपुरवठा केला. रायगड जिल्ह्यातील उरणसारख्या हजारो हेक्टर शेती असलेल्या भागात शेतकऱ्यांना खतासाठी वाट पाहावी लागली होती. ऐन हंगामात उरण तालुक्यातील ग्रामीण विभागात रासायनिक तसेच मिश्रण खतांचा तुटवडा निर्माण झाला होता. त्यामुळे शेतकरीवर्गाला खतांसाठी धावाधाव करावी लागली. खरीप हंगामात घेण्यात आलेल्या भात रोपांच्या उत्तम वाढीसाठी शेतकरी खतांचा वापर करतात. मात्र, भात रोपांची वाढ जलद व्हावी, यासाठीदेखील या भागात पुरेशा प्रमाणात खत उपलब्ध नसल्याच्या तक्रारी अनेक शेतकऱ्यांकडून ऐकावास मिळत होत्या. तालुक्यात भातलावणीची कामे आता शंभर टक्के पूर्णत्वास गेली आहेत.

यावर्षी पावसाने वेळेपूर्वीच, म्हणजे मे महिन्याच्या अखेरीस हजेरी लावली. त्यामुळे मे महिन्याच्या अखेरीस अवकाळी पाऊस मोठ्या प्रमाणात झाला. त्यापाठोपाठ लगेच मान्सूनची हजेरी, त्यामुळे शेतीच्या कामात मोठ्या अडचणी आल्या. शेतकऱ्यांना धूळ वाफ्याची पेरणी करताच आली नसल्यामुळे, येथील शेतकऱ्यांना चिखल पेरा करावा लागला. जून महिन्यामध्ये सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना दुबार-तिबार भाताची पेरणी करावी लागली. एकंदरीत, शेतकऱ्यांपुढे निसर्गाचे मोठे आव्हान होते. त्यानंतर भात रोपे तयार झाल्यावर जुलै महिन्याच्या मध्यंतरी भात लावणीला सुरुवात झाली. अशातच शेतकऱ्यांनी भाताची लागवड केली. मात्र, भातरोपांची कमतरता असल्यामुळे भात खाचरातील शेतकऱ्यांना शेतीची लागवड करण्यासाठी भातरोपे कमी पडली. मात्र अशा अवस्थेत शेतकऱ्यांनी कशीबशी भात लावणी पूर्ण केली. दरम्यान काही विरळ प्रमाणात शिल्लक राहिलेल्या आणि आपली शेती ओसाड राहू नये यासाठी अनेक ठिकाणाहून शेतकऱ्यांनी भाताची रोपे विकत आणून, त्या रोपांची लागवड आपल्या शेतात केली आहे. या भात पिकांच्या भरघोस वाढीसाठी शेतकऱ्यांना खतांचा तुटवडा भासू लागला होता. उरण पनवेलमध्ये कुठेही खते उपलब्ध नसल्याची माहिती मिळत असतानाच, कृषीवलच्या वृत्ताच्या दणक्याने उरण तालुक्यासाठी सध्या ५० टन खत उपलब्ध झाले आहे. अजून ५० टन खत उरण तालुक्यासाठी पुरविले जाणार असल्याची माहिती कृषी विभागाकडून देण्यात आली.

उरण तालुक्यात सध्या लागवडीखालील क्षेत्रफळ २४.११ हेक्टर आहे. साधारणतः एका हेक्टरला १०० किलो खताची मात्रा द्यावी लागते. परंतु ४०० टनपर्यंत खत उरण तालुक्यासाठी पुरेसे असून, काही प्रमाणात खत उपलब्ध झाले आहे. उर्वरित खत लवकरच शेतकऱ्यांसाठी उपलब्ध होईल. असे एस.जी. गटकळ यांनी सांगितले.


### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल मुदस्सर गुलजार पालटे यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक १)श्रीम.कल्पना उर्फ भाग्यश्री सुभाष विरले, २) श्रीम.रेश्मा तातु विरले, ३) श्रीम. मनिषा काशिनाथ डायरे, ४) श्रीम.सुलभा उर्फ सुवर्णा गुरुनाथ तरे यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे.ममदापुर, ता.कर्जत, जि.रायगड.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ८१ | १ | ०-२४-०० पो.ख. ०-०६-५० | २-८८ |

**सदर मिळकतीमधील वर नमुद मालकांचे हिश्याची व मालकीची ०-१०-०० आर. क्षेत्राची मिळकत विकत देणेचे ठरले आहे.**

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दि. ०६/०८/२०२५

**ॲड. नरेश रामदास आहीर**
पत्ता- शॉप नं.१२, शिवगंगा
अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ
ता.कर्जत, जि.रायगड
मो.-९३२५०६००३७.



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेला वाणिज्य गाळा व त्या गाळ्यांचे मालक/कब्जेदार श्री.अमृत गणेशमल जैन यांचेकडून आमचे अशिल आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अलिबाग तर्फे चेअरमन श्री.अभिजीत सुरेश पाटील हे कायमस्वरूपी खरेदी करण्याच्या विचारात आहे. तशा प्रकारची बोलणी विद्यमान मालकांबरोबर चालू आहेत. त्या वाणिज्य गाळ्याचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे तळबंद, ता.अलिबाग, जि.रायगड येथील सर्व्हे नंबर १/२ व २९/१, या बिनशेती मिळकतीवर बांधलेल्या जमनाबाई सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित जमनानगर या इमारतीमधील तळ मजल्यावरील वाणिज्य गाळा नं. ३,४,५,६ क्षेत्रफळ १०९० चौ.फुट ज्याचा ग्रुप ग्रामपंचायत शहाबाज वाणिज्य गाळा मालमत्ता क्र.९० हा वाणिज्य गाळा या जाहीर नोटीशीचा विषय आहे.

वर नमुद केलेल्या सदर वाणिज्य गाळा क्र. ३,४,५,६ कोणाचाही, कसलाही हक्क हितसंबंध, बोजा, गहाण, दान, बक्षिस, लिज, वहिवाट, वारसा, इजमेंट, अदलाबदल, भाडेकरार, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, करार-मदार, दावा, खरेदीखत, साठेकरार, अखत्यारपत्र अगर कुठल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध अगर अधिकार असल्यास अशा व्यक्तीने आपला हक्क लेखी पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५(पंधरा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर सर्व संबंधीत कागदोपत्री पुरावा घेऊन खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदरची निवासी सदनिका ही पूर्णपणे निर्वेध, निर्जोखमी आहे, असे समजून अथवा कोणाचाही हक्क अगर हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही कसलीही तक्रार आल्यास आमच्या अशिलांवर ती बंधनकारक राहणार नाही.

कळावे.
अलिबाग,
तारीख : ०५/०८/२०२५

सही/-
**ॲड. सचिन दिनकर पाटील**
बी.ए.एल.एल.बी मुंबई
२१ पारिजात सोसायटी चेंढरे,
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९२२६८७२६९०



### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे - बांधिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालक खालील प्रमाणे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :

**मौजे- बांधिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमिन मिळकत.**

| मालकाचा नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे आर-पॉ) | आकारणी (रु. पै.) |
|---|---|---|---|---|
| १) जयश्री संजय कर्पे<br>२) स्वरूप संजय कर्पे<br>३) ओमकार संजय कर्पे | १३२ | ९ | ३-५५-०० | ३५-५० |

वरील मिळकती ह्या आमचे अशिलांस विकत देणेचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे. सही/-
दिनांक :- ०४/०८/२०२५

कार्यालयीन पत्ता :-
२ श्री राम नयन बिल्डींग
यूनियन बँक जवळ, खांडा,
नेरळ ता. कर्जत जि. रायगड
४१०१०१

**अधिवक्ता श्रीनाथ नारायणन नायर**
(बी.एल.एस., एलएल. बी., एलएल. एम)
मो. - ७५२२९३४२२२



### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे - बोपेले, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालक खालील प्रमाणे यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :

**मौजे- बोपेले, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमिन मिळकत.**

| मालकाचा नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे आर-पॉ) | आकारणी (रु. पै.) |
|---|---|---|---|---|
| श्री. रामचंद्र शांताराम मोरे | २९ | १/अ/४ | २-९६-०० | २९-६० |

वरील मिळकती ह्या आमचे अशिलांस विकत देणेचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे. सही/-
दिनांक :- ०५/०८/२०२५

कार्यालयीन पत्ता :-
२ श्री राम नयन बिल्डींग
यूनियन बँक जवळ, खांडा,
नेरळ ता. कर्जत जि. रायगड
४१०१०१

**अधिवक्ता श्रीनाथ नारायणन नायर**
(बी.एल.एस., एलएल. बी., एलएल. एम)
मो. - ७५२२९३४२२२

# जेएनपीटी विद्यालयातील कर्मचाऱ्यांचा आक्रोश



शिक्षकांचा आमरण उपोषणाचा इशारा

| उरण | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील जवाहरलाल नेहरू पोर्ट (शेवा) विद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आता सहनशीलतेच्या पलीकडे पोहोचले आहेत. गेल्या सात वर्षांपासून सुरू असलेला आर्थिक छळ आणि मानसिक त्रासाला कंटाळून त्यांनी येत्या ११ ऑगस्टपासून आमरण उपोषणाचा पवित्रा घेतला आहे. याबाबत संबंधित प्रशासनाला निवेदन दिले आहे. त्यामुळे नव्याने कार्यभार स्वीकारलेल्या रुस्तमजी केरावाला फाऊंडेशन (विग्बोर) संस्थेने चालवलेला अन्याय आता चव्हाट्यावर आला आहे.

कर्मचाऱ्यांनी दिलेल्या निवेदनानुसार, रुस्तमजी केरावाला फाऊंडेशनने सातवा वेतन आयोग तर लागू केला नाहीच, त्यासोबतच सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे मिळणारी वार्षिक वेतनवाढ आणि महागाई भत्ता देखील जुलै २०१९ पासून दिलेला नाही. गेल्या सात वर्षांपासून ही थकीत रक्कम मिळालेली नाही. त्यामुळे प्रत्येक कर्मचाऱ्याची आर्थिक कुचंबणा झाली असून त्यांची मानसिकता ढासळली आहे. याबाबत वारंवार शालेय समितीमध्ये विषय काढूनही संस्थेच्या प्रशासनाने याकडे सोयीस्करपणे डोळेझाक केली आहे. त्यामुळे आता कर्मचाऱ्यांनी अत्यंत कठोर निर्णय घेतला आहे. जोपर्यंत सात वर्षांची थकीत रक्कम फरकासह त्यांच्या बँक खात्यात जमा होत नाही, तोपर्यंत ते जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालयातील माध्यमिक इमारतीच्या गेटसमोर शांततेच्या मार्गाने आमरण उपोषण करणार आहेत. याबाबतच्या निवेदनाची एक प्रत उरण व पनवेलच्या विद्यमान आमदारांसह माजी आमदार मनोहर भोईर व अनेक राजकीय नेते, पालक संघटना, शिक्षक संघटना, समाजसेवक, कामगार नेते आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना पाठवण्यात आली आहे. तसेच, निवेदन देतेवेळी त्यांनी प्रशासनाला स्पष्ट शब्दात सांगितले की, जर ११ ऑगस्ट पूर्वी थकीत रक्कम मिळाली नाही आणि या उपोषणादरम्यान कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला, तर त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असेल. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी आता न्यायासाठी थेट आंदोलनाचा मार्ग अवलंबला असून, त्यांच्या मागण्या मान्य होईपर्यंत हा लढा सुरूच राहणार असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे.

### केवळ कागदावरच हस्तांतरण

**शासकीय नियमांनुसार शाळेचे हस्तांतरण होऊन जवळजवळ तीन वर्षांचा काळ लोटला आहे. तरीही कर्मचाऱ्यांच्या मागण्या कागदावरच राहिलेल्या आहेत. सर्व शासकीय कार्यालयांमध्ये वारंवार पत्रव्यवहार करूनही आमच्या पत्रव्यवहाराची योग्य प्रकारे दखल घेण्यात आलेली नाही, असे कर्मचाऱ्यांनी निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे गेली सहा वर्षे केलेल्या पाठपुराव्यानंतरही सर्व प्रश्न प्रलंबितच राहिले आहेत. या अन्यायामुळे कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे, असेही कर्मचाऱ्यांनी सांगितले.**

## निवडक



### गटारांची कामे युद्धपातळीवर

**चिरनेर :** उरण तालुक्यातील चिरनेर गावात सांडपाणी वाहून नेण्यासाठी भुयारी गटारांचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. १५वा वित्त आयोगाच्या निधीतून ही कामे सुरू आहेत. चिरनेर गावात सात पाडे असून, गावात सांडपाणी वाहून नेणाऱ्या गटारांची व्यवस्था मागील काही वर्षांपूर्वीच करण्यात आलेली आहे. मात्र, मधीलपाडा, कुंभार पाडा, मुळपाडा, खारपाटीलआळी साईनगर कातळपाडा तसेच गावातील अन्य भागात बांधण्यात आलेल्या भुयारी गटारांमधून सांडपाण्याचा व्यवस्थितरित्या निचरा होत नसल्यामुळे हे गटाराचे सांडपाणी रस्त्यावर येत आहे. त्यामुळे नागरिकांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत असे. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी पसरली होती. नागरिकांच्या तक्रारीनुसार चिरनेर ग्रामपंचायतीने ही गंभीर बाब लक्षात घेऊन, या भुयारी गटारांच्या कामाकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊन, मोठ्या व्यासाची पाईप लाईन गटारे बांधण्याच्या कामाला सुरुवात केली आहे.



### शांतताप्रिय नागोठण्याला गालबोट लावू नकाः कुलकर्णी

**नागोठणे :** नागोठणे हे शांतताप्रिय असल्याचा इतिहास आहे. त्यामुळे त्याला कुठेही गालबोट लागेल व उपलब्ध पोलीस बळाचा वापर करून कारवाई करावी लागेल, असा कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची काळजी घ्या. कोणतीही माहिती मिळाली तर तुम्ही कायदा हातात न घेता पोलिसांना कळवा. बाहेरून येणाऱ्या नागरिकांवर लक्ष ठेवा व काही संशयास्पद वाटल्यास थेट मला संपर्क करा. तसेच आगामी रक्षाबंधन, नारळी पौर्णिमा, कृष्णजन्म, दहीहंडी यांसह पुढील काळात येणारे सर्वधर्मीय सण व उत्सव शांततेत साजरे करा आणि शांतताप्रिय नागोठण्याला गालबोट लावू देऊ नका, असे आवाहन नागोठणे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांनी शांतता समितीच्या बैठकीत केले. नागोठणे पोलीस ठाणे हद्दीतील शांतता समिती सदस्य, पत्रकार, मोहल्ला कमिटी सदस्य, महिला दक्षता समिती सदस्य यांची बैठक नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांच्या दालनात सोमवारी (दि.४) घेण्यात आली. त्यावेळी सपोनि सचिन कुलकर्णी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.



### उच्च शिक्षण वसतिगृहासाठी सहाय्य करणारः संजय पाटील

**नेरळ :** धामोते कोल्हारे येथील हुतात्मा हिराजी पाटील सामाजिक सभागृहात विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रम पार पडला. यावेळी आगरी समाजातील दहावी-बारावीमधील १६० गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमादरम्यान, कर्जत तालुक्यातील आगरी समाजातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी समाज संघटना वसतिगृह आणि स्पर्धा परीक्षेसाठी अभ्यासिका उभारण्याचा संकल्प केला आहे. याकार्यासाठी आगरी समाजाचे नेते सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे खासदार संजय पाटील यांनी जाहीर केले. तर, कर्जत तालुक्याच्या आगरी समाज हॉलचे सुशोभीकरणासाठी १० लाखाचा निधी कामगार नेते राष्ट्रीय इंटक अध्यक्ष महेंद्र घरत यांनी जाहीर केले. यावेळी मुंबई ईशान्य मतदारसंघाचे खासदार संजय पाटील, इंटकचे राष्ट्रीय अध्यक्ष कामगार नेते महेंद्र घरत, कुळगाव-बदलापूरचे माजी नगराध्यक्ष वामन म्हात्रे, अखिल आगरी समाजाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष शरद म्हात्रे, आगरी कोळी गावठाण क्षेत्र याचिकाकर्ते जयेंद्र खुणे, जि.प. माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, कोल्हारेचे सरपंच महेश विरले यांच्यासह वसंत कोळंबे, सावळाराम जाधव, भरत भगत, ए.टी. पाटील, सूर्यकांत चंचे, शरद भगत आणि संघटनेचे अध्यक्ष संतोष पेरणे, उपाध्यक्ष भगवान धुळे, शिवाजी कराळे आदी मान्यवर उपस्थित होते.



# श्रीवर्धनमध्ये गुटखा विक्रेत्यावर धाड

## ९१ हज़ार रुपयांचा गुटखा जप्त

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन पोलीस ठाण्यामध्ये उमेश पाटील हे नव्याने पोलीस निरीक्षक म्हणून हजर झाले आहेत. पोलीस निरीक्षकपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर दहा ते बारा दिवसांच्या कालावधीनंतर श्रीवर्धन पोलिसांनी तालुक्यात व शहरामध्ये गुटखा विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यास गुटखा पुरवठा करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कारसह अटक केली आहे. मात्र, अटक करण्यात आलेला गुटखा व्यापारी हा मूळ मालक नसून या सर्व छोट्या गुटखा विक्रेत्यांना गुटखा पुरवणारा म्हसळे येथील मोठा गुटखा माफिया अद्यापही रायगड पोलिसांना गुंगारा देत आहे.

श्रीवर्धनचे पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांना ४ ऑगस्ट रोजी शहरातील बुडण पाखडी परिसरामध्ये एकजण गुटखा विक्री करण्यासाठी आल्याची गुप्त माहिती मिळाली होती. या मिळालेल्या माहितीनंतर श्रीवर्धनच्या पोलिसांनी बुडण पाखडीत पहाणी केली. त्यावेळी त्यांना एका घराच्या परसावामध्ये चंदेरी रंगाच्या कारजवळ एक संशयास्पद व्यक्ती उभा असल्याचे निदर्शनास आले. त्याकडे चौकशी केली असता त्याने उत्तर देण्यास नकार दिला. त्यानंतर कारची तपासणी केली असता, कारमध्ये विमल कंपनीच्या प्रतिबंधित गुटक्याच्या एकूण सहा बॅग मिळून आल्या. त्याची अंदाजे किंमत ९१ हजार ५२० रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. मिळालेला गुटखा आणि कार मिळुन एकूण २ लाख ४१ हजार ५२० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. श्रीवर्धन पोलिसांकडून आरोपी शोएब फारुख पटेल (२७) याला ताब्यात घेण्यात आले आहे. या प्रकरणी रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे, श्रीवर्धनच्या उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीवर्धन पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## हुतात्मा स्मारक सभागृहाच्या छताची पडझड



| चिरनेर | प्रतिनिधी |

चिरनेर जंगल सत्याग्रहातील स्वातंत्र्यसंग्रामात आपल्या प्राणाचे बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांच्या नावाने उभारलेल्या चिरनेर गावातील हुतात्मा स्मारकाच्या सभागृहाच्या छताच्या सिलिंगची पडझड झाली आहे. या पडझडीमुळे ऐतिहासिक हुतात्मा स्मारकाला भेटी देणारे पर्यटक नाक मुरडत आहेत. त्यामुळे चिरनेर ग्रामस्थांबरोबर स्वातंत्र्यप्रेमी देशभक्तांनी याबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

भारतीय स्वातंत्र्य संग्राम त जे-जे उठाव झाले त्यात चिरनेरच्या जंगल सत्याग्रहाचा आवर्जून समावेश करावा लागेल. ब्रिटिशांच्या विरोधात ज्या वीरांनी आपले हौतात्मे दिले, त्यात चिरनेरच्या जंगल सत्याग्रहातील सर्वच हुतात्म्यांचा सहभाग होता. या हुतात्म्यांच्या नावाने उभारण्यात आलेली स्मारके आजही प्रेरणादायी आहेत. मात्र, सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारीत असलेल्या या हुतात्मा स्मारकांच्या देखभालीच्या कर्तव्यात कसूर होत असल्याचे दिसून येत आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याला या हुतात्मा स्मारकाच्या सभागृहाच्या छताची झालेली पडझड दिसली नाही का? असा सवालही नागरिकांतून व्यक्त केला जात आहे. दरम्यान, चिरनेरचे सरपंच भास्कर मोकल, उपसरपंच अरुण पाटील, माजी उपसरपंच सचिन घबाडी यांच्यासह ग्रामपंचायतीच्या सदस्यांनी सार्वजनिक बांधकाम खात्याला या संदर्भात लेखी निवेदन दिले आहे. येत्या २५ सप्टेंबर रोजी साजऱ्या होणाऱ्या चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या स्मृतिदिनाच्या पूर्वी हुतात्मा स्मारकाच्या छताच्या सिलिंगच्या पडझडीची दुरुस्ती संबंधित सार्वजनिक बांधकाम खात्याने करावी, अशी मागणी या लेखी निवेदनातून करण्यात आली आहे.

## तोतया पोलिसांपासून सावध रहा!

| पनवेल | प्रतिनिधी |

पोलीस असल्याची बतावणी करून लुटणाऱ्यांपासून सावध रहा, सतर्क रहा, असे आवाहन पनवेल शहर पोलिसांनी केले आहे. पुढे खुन झाला आहे, चेकींग सुरू आहे. पुढे नाकाबंदी चालू आहे. दागिने काढून ठेवा, आम्ही चोर पकडला आहे. त्याने चोरी केलेले दागिने तुम्ही परिधान केलेल्या दागिन्यांसारखे आहेत, असे सांगून त्या व्यक्तीकडील दागिने, मौल्यवान वस्तू हातचलाखीने चोरी करणे, असे चोरांचे उद्दीष्ट असून खरे पोलीस असे करण्यास कधीही सांगत नाहीत. तसेच, असे करणाऱ्याचा कोणी प्रयत्न केल्यास घाबरुन न जाता ११२ या क्रमांकावर पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन देखील त्यांनी केले आहे.

## असंख्य लाभार्थ्यांना दाखल्याचा आधार



बेलोशीमध्ये महसूल विभागामार्फत कार्यक्रम

| अलिबाग | प्रतिनिधी |

महसूल सप्ताह निमित्त अलिबागमध्ये वेगवेगळे उपक्रम घेण्यात आले. त्याचा एक भाग म्हणून 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' सोमवारी (दि.४) अलिबाग तालुक्यातील बेलोशीमध्ये राबविण्यात आले. या अभियानातून असंख्य लाभार्थ्यांना दाखल्यांचा आधार मिळाला आहे बेलोशी ग्रामपंचायतीच्या सभागृहामध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' अंतर्गत विविध दाखले वाटप, पीक पाहणी, जिवंत सातबारा टप्पा २, वाळू वाटप धोरण इत्यादी संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी माजी सरपंच कृष्णा भोपी, पंचायत समितीचे माजी सदस्य श्रीधर भोपी, ग्रामपंचायत सदस्य भास्कर भोपी, गिरीश पाटील, बाळाराम शीद, सुडकोलीचे माजी सरपंच जयवंत तांबटकर, मंडळ अधिकारी रामराज रुपेश रेवस्कर, ग्राम महसूल अधिकारी शशिकांत कांबळे, अक्षय देशमुख, संतोष बोडके, पायल पाटील, दिशा कडू, काजल कांबळे, महेंद्र वादळ, मोहन लोभी, भारती पालकर, आशा सेविका, अंगणवाडी सेविका व ग्राम स्थ उपस्थित होते.

## आदर्श पतसंस्थेची वार्षिक सभा

### पुण्यातील पतसंस्था विलीनीकरणाचा निर्णय



| अलिबाग | प्रतिनिधी |

आदर्श नागरी सहकारी पथसंस्थेची २७वी वार्षिक सभा आदर्शचे अध्यक्ष अभिजित पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी (दि.२) कुरूळ-अलिबाग येथील क्षात्रैक्य माळी समाज हॉल येथे पार पडली. या सभेत कोथरूड-पुणे येथील सरस्वती महिला नागरी सहकारी पतसंस्था आदर्श पतसंस्थेत विलीनीकरण करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला आहे. तसेच, अनेक ठराव मंजूर करण्यात आले आहेत. त्याचबरोबर आदर्श तर्फे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय अलिबाग व जिल्हा पोलीस कल्याण निधीला प्रत्येकी १ लाख रुपये मदतीचे धनादेश देण्यात आले.

दरम्यान, नाना शंकर शेठ यांच्या पुण्यतिथि निमित्ताने संस्थेमध्ये घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले. या स्पर्धेत रेवस शाखाधिकारी कौस्तुभ म्हात्रे यांना प्रथम, चेंढरे शाखाधिकारी रेश्मा पाटील यांना द्वितीय, तर कुरुळ शाखाधिकारी प्रियांका जगताप-वाळंज व चोंढी शाखा सहशाखाधिकारी श्रीराज पावशे यांना तृतीय क्रमांकाचे पारितोषिक विभागून देण्यात आले. तसचे, संस्थेचे ज्येष्ठ सभासद सुभाष पानसकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी संस्थेचे संस्थापक सुरेश पाटील यांनी संस्थेतर्फे बँकिंग व सहकाराचे प्रशिक्षण वर्ग सुरू करण्याचा मनोदय आपल्या मनोगतात व्यक्त केला. संस्थेचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी संस्थेची आर्थिक स्थिती सभासदांसमोर सादर केली. या सभेला कैलास जगे, अनंत म्हात्रे, सतीश प्रधान, ॲड. आत्माराम काटकर, विलाप सरतांडेल, ॲड. रेश्मा पाटील, ॲड. वर्षा शेठ, भगवान वेटकोळी, रामभाऊ गोरीवले, महेश चव्हाण, श्रीकांत ओसवाल, संजय राऊत (सी.ए), डॉ.मकरंद आठवले आदी संचालक उपस्थित होते.

पीएनपी सांस्कृतिक कलाविकास मंडळातर्फे आयोजन | बालकलाकारांसाठी स्तुत्य उपक्रम

# अलिबागमध्ये बालनाट्य 'अभिवाचन कट्टा'

| अलिबाग | प्रतिनिधी |

मराठी बालनाट्य दिनानिमित्त बालकलाकारांना व्यासपीठ मिळावे, मराठी मातृभाषा चांगल्या पद्धतीने वाचता यावी, त्यांचा आत्मविश्वास वाढावा या उद्देशाने खास बालनाट्य अभिवाचनाचे आयोजन करण्यात आले होते. अलिबाग पीएनपी सांस्कृतिक कलाविकास मंडळ अंतर्गत ग्रामीण रंगभूमी तर्फे 'अभिवाचन कट्टा' हा उपक्रम शनिवारी (दि.२) पीएनपीच्या प्रशासकीय कार्यालयाच्या सभागृहात राबविण्यात आला.




पीएनपी कलाविकास मंडळाच्या अध्यक्षा चित्रलेखा पाटील आणि चित्रपट दिग्दर्शक, संगीतकार विक्रांत वार्डे यांच्या संकल्पनेतून तसेच ग्रामीण रंगभूमीचे अध्यक्ष राजन पांचाळ यांच्या मार्गदर्शनातून पीएनपी सांस्कृतिक कलाविकास मंडळ अंतर्गत कला क्षेत्रात विविध उपक्रम चांगल्या पद्धतीने राबविले जात आहेत. त्यामुळे स्थानिक कलाकारांना कला सादर करण्याची संधी उपलब्ध होत आहे. त्याच पार्श्वभूमीवर शनिवारी अभिवाचन कट्टा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमादरम्यान, चौल मोरया क्रिएशन प्रस्तुत 'गणपती बाप्पा मोरया' या नाटकाचे अनन्या प्रभाळे, आदीत्य आठवले, गणेश प्रभाळे, प्रकाश कवळे, निलेश वर्तक आणि नव्या वर्तक यांनी वाचन केले. पेझारी अनंत थिएटर प्रस्तुत 'जीर्णोद्धार' या नाटकाचे आराध्य पाटील, रिद्धी पिंगळे, स्वराज काकडे, आदीत्य म्हात्रे, श्रावणी सुतार आणि तनिष्का पाटील या बालकलाकारांनी वाचन केले. यावेळी मुंबई येथील सीबीआयचे सहाय्यक पोलीस आयुक्त भारत दिघे यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी अलिबागमधील रंगकर्मी राजन पांचाळ, सागर नार्वेकर, किशोर म्हात्रे, संतोष बोंद्रे, योगेश पवार, सुचित पाटील, मंगेश सुतार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच, विक्रांत वार्डे यांनी मार्गदर्शन करताना सादर झालेली दोनही बालनाट्य पीएनपी कलाविकास मंडळाच्यावतीने अलिबागमधील पीएनपी नाट्यगृहाच्या रंगमंचावर सादर करण्यात येतील, असे जाहीर केले.

### बालकलाकारांना संधी

मोबाईलमध्ये रमणाऱ्या पिढीला कलेच्या माध्यमातून उभारी देण्याचा प्रयत्न 'अभिवाचन कट्टा' या उपक्रमातून देण्यात आला. अलिबाग पीएनपी सांस्कृतिक कलाविकास मंडळ अंतर्गत ग्रामीण रंगभूमी तर्फे अभिवाचन कट्टा उपक्रम राबविण्यात आला. लहान मुलांच्या सुप्त गुणांना वाव देण्याबरोबरच पीएनपी नाट्य गृहाच्या माध्यमातून त्यांना हक्काचे व्यासपिठ देण्याची संधी उपलब्ध करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याबद्दल पालकांसह कलाकारांकडून आणि विविध क्षेत्रातून शुभेच्छा देण्यात आल्या.

> **जिल्ह्यातील ग्रामीण भागातील हौशी नाट्य मंडळ आणि कलाकारांना प्रोत्साहित करण्यासाठी, त्यांना रंगमंच उपलब्ध करणे, त्यांना शिबिराच्या माध्यमातून प्रशिक्षण देऊन कलाकार घडवणे या उद्देशाने पीएनपी कलाविकास मंडळाच्या अध्यक्षा चित्रलेखा पाटील, चित्रपट दिग्दर्शक, संगीतकार विक्रांत वार्डे यांच्यासह रंगभूमीची स्थापना केली. त्याचाच एक भाग म्हणजे 'अभिवाचन कट्टा' हा उपक्रम आहे. ग्रामीण रंगभूमीच्या माध्यमातून सर्व क्षेत्रातील कलाकारांसाठी विविध उपक्रम राबविण्याचा मानस आहे. चित्रलेखा पाटील यांच्या मार्गदर्शनाने ग्रामीण रंगभूमीचे पदाधिकारी, ग्रामीण रंगभूमी आणि कलाकार सशक्त करणार, असा विश्वास आहे.**
>
> – राजन पांचाळ, अध्यक्ष, ग्रामीण रंगभूमी

## २४ बॅटऱ्यांचा सेट चोरीस

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल जवळील गव्हाण फाटा येथील एअरटेल मोबाईल कंपनीच्या टॉवरला लावण्यात आलेल्या मरराजा कंपनीच्या काळ्या रंगाच्या २४ बॅटऱ्यांचा सेट चोरीला गेल्याची घटना घडली आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. येथील सुरक्षा रक्षक सोमनाथ जाधव यांनी दिलेल्या तक्रारीनुसार तेथे असलेल्या एअरटेल मोबाईल कंपनीच्या टॉवरला लावण्यात आलेल्या ७२ हजार रुपये किंमतीचा एक अमरराजा कंपनीच्या काळ्या रंगाच्या २४ बॅटऱ्यांचा सेट चोरीला गेला आहे. त्याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## बरोबरीत सुटलेला डाव

भारत आणि इंग्लंडमधील नुकतीच संपलेल्या कसोटी क्रिकेट मालिकेचे वर्णन अद्भुत असे करावे लागेल. टीट्वेंटी सामन्यात शेवटच्या चेंडूपर्यंत सामना कुठेही फिरू शकतो हे आपण अनेकदा पाहिले आहे. टीट्वेंटीच्या पहिल्या विश्वचषकातला भारत आणि पाकिस्तानमधला सामना टाय झाला होता व शेवटी तेव्हाच्या नियमानुसार फलंदाज नसताना नुसतीच गोलंदाजी करून यष्ट्या उडवण्यामध्ये भारत सरस ठरला होता. त्यातही कहर म्हणजे पाकिस्तानच्या नेहमीच्या गोलंदाजांना जे जमले नाही ते वीरेंद्र सहवागने करून दाखवले होते. त्या बरोबरीच्या सामन्याची आठवण व्हावी अशीच ही कसोटी मालिका ठरली. भारताचा संघ अलिकडे मुळात कसोटी सामने कमी खेळतो. त्यातही आयपीएल व इतर सामन्यांमुळे देशातच इतके क्रिकेट चालू असते की आपले गडी परदेशात कमी खेळतात. आणि, जेव्हा खेळतात तेव्हा हमखास ढेपाळतात असा अनुभव आहे. गेल्या काही वर्षात ऑस्ट्रेलियाला ऑस्ट्रेलियात जाऊन हरवण्याचा पराक्रम काही वेळेला आपण केला. पण इंग्लंडविरुद्ध त्यांच्याच देशात खेळणे हे मात्र आपल्यासाठी कायम कठीण ठरत आले आहे. त्यातच यंदा कसोटी संघात रोहित शर्मा व विराट कोहली हे अनुभवी खेळाडू नव्हते. बुमरा हा आपला हुकुमी एक्काही सतत जखमी असल्याने संघातून आतबाहेर होता. शुभमन गिलने देशात देखील कधीही कसोटी सामन्यांमध्ये भारताचे नेतृत्व केले नव्हते. अशा वेळी अचानक त्याच्यावर परदेशातील मालिकेत नेतृत्वाची जबाबदारी टाकणे हे वादग्रस्त होते. शिवाय, गेल्या काही वर्षातली गिलची कामगिरी फारशी सातत्यपूर्ण राहिलेली नाही. एकूण नवा कर्णधार आणि नवशिके खेळाडू असा हा संघ इंग्लंडविरुद्ध पाच विरुद्ध शून्य असा हरून येईल असे अनेकांचे भाकित होते. पण प्रत्यक्षात ही मालिका २-२ अशी बरोबरीत सुटली. शेवटच्या ओव्हलवरच्या सामन्यात तर कमाल झाली. इंग्लंडला शेवटच्या दिवशी विजयासाठी केवळ ३५ धावा हव्या असताना आणि त्याच्याकडे चार गडी बाकी असतानाही भारताने टिच्चून गोलंदाजी केली व पराभवाच्या जबड्यातून विजय खेचून आणला. इतका की, समोर खेळणारा संघ हा इंग्लंड आहे की, नेहमी ऐन विजयाच्या उंबरठ्यावर अडखळून पडणारा आफ्रिकेचा संघ आहे असा प्रश्न पडावा.

### नवशिक्यांचा संघ

भारतीय संघात नवशिके अधिक होते. इंग्लंडमध्ये बेन स्टोक्स हा त्यांचा कर्णधार, ज्यो रूट हा माजी कर्णधार व जोफ्रा आर्चरसारखे गोलंदाज हे अधिक अनुभवी व मातबर होते. त्या मानाने त्यांचे बाकीचे खेळाडू तसे सामान्यच होते. पण दोन्ही संघातल्या या सामान्य खेळाडूंनीच फलंदाजी व गोलंदाजीत पराक्रम गाजवला. पाचही सामने पाचव्या दिवसापर्यंत खेळले गेले. विशेष म्हणजे पावसाचा व्यत्यय येऊन डाव वाया असेही प्रकार घडले नाहीत. दोन्ही संघांच्या एकूण वीस डावांमध्ये मिळून तब्बल ७१८७ धावा कुटल्या गेल्या. हीच सरासरी ३५० पडते. त्यामुळे तीनशेपेक्षा अधिक धावा होण्याचे प्रकार यावेळी वीसपैकी चौदा वेळा घडले यात आश्चर्याचे कारण नाही. मालिकेत चारशेपेक्षा अधिक धावा करणारे दोन्ही संघांमध्ये मिळून नऊ फलंदाज आहेत. यामध्ये पन्नास अर्धशतके झळकवली गेली व तब्बल २१ अर्धशतके झाली. शुभमन गिल तर त्रिशतक करू शकण्यापर्यंत पोचला होता. कसोटी मालिकेत सर्वाधिक म्हणजे तब्बल १९ शतकी भागीदाऱ्या होण्याचा प्रकारही यावेळी घडला. पण इतके असूनही तीन तीन दिवस एकच संघ खेळतो आहे व सामने अनिर्णित संपताहेत असा प्रकार यावेळी घडला नाही. दोन्ही संघांचे दोन्ही डाव नेहमी आटपले व सामने निकाली झाले. भारताने जो सामना अनिर्णित ठेवला तोही एक वेगळाच पराक्रम ठरला. आपल्या वॉशिंग्टन सुंदर व जडेजा या गोलंदाजांनी शतके झळकावून इंग्लंडच्या नाकात दम आणला. शेवटी बेन स्टोक्सला आता आम्ही दमलो, सामना थांबवूया अशी विनंती करावी लागली. एकूणच, दोन्ही संघातील फलंदाजांनी मैदान गाजवले. त्या मानाने दोघांचीही गोलंदाजी तितकीशी धारदार व भरवशाची नव्हती. एक किंवा दोन गोलंदाज मालिकेत दहशत गाजवत आहेत आणि सामने गुंडाळत आहेत असे घडले नाही. सर्वच गोलंदाज एकेका टप्प्यात प्रभावी ठरले. पण नंतर त्यांना एकही बळी मिळवता आला नाही.

### दोन्ही संघ सरासरी

बुमरा, आर्चर, वोक्स या सर्वांच्या बाबत असे झाले. आकाशदीप हा नवोदित एका सामन्यात कमालीचा यशस्वी झाला. त्याला दहा बळी मिळाले व भारताने तो सामना जिंकला. पण उर्वरित सामन्यात तो सामान्य ठरला. भारतापुरते बोलायचे तर यष्टिरक्षक रिषभ पंत आणि सलामीचा अनुभवी के.एल. राहुल यांचीच कामगिरी सातत्यपूर्ण राहिली. खुद्द गिलबाबतही भरवसा वाटावा अशी त्याची फलंदाजी झाली नाही. तो अगदी सामान्य चेंडूवर बाद झाला. शेवटच्या सामन्यात तर तो ज्या धाव नसताना ज्या रीतीने आत्मघातकीपणे बाद झाला ते गुन्हेगारी स्वरुपाचे होते. करुण नायरला बऱ्याच वर्षांनी संधी मिळूनही त्याला तिचे सोने करता आले नाही. साई सुदर्शन हा भारतात कमालीचा यशस्वी वाटत होता. पण तो इंग्लंडात अपयशी ठरला. त्या मानाने सुंदर, जडेजा अशा खालच्या फळीतील लोकांनी चांगली फलंदाजी करून आपली लाज राखली. गोलंदाजीमध्ये अर्शदीप सिंग या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाला तसेच कुलदीप यादव या फिरकीपटूला शेवटपर्यंत न खेळवण्याचा हट्ट अनाकलनीय होता. महंमद सिराजला पुरेसे यश मिळाले नसले तरी त्याने कायमच टिच्चून गोलंदाजी केली. शेवटच्या दिवशी तर त्याने कमालच केली व भारताला त्याच्याच मुळे विजय मिळाला. गौतम गंभीर वा सहकारी प्रशिक्षकांची कामगिरी फारशी चांगली नव्हती. आपले क्षेत्ररक्षण अत्यंत वाईट होते. यशस्वी जयस्वाल वगैरे तरुण मंडळी अत्यंत किरकोळीत व बेजबाबदारपणे विकेट फेकताना दिसले. दुसरीकडे प्रसिध्द कृष्णाने चांगली कामगिरी केली असली तरी तिच्यात सातत्य नव्हते. त्याने धावाही खूप दिल्या व सिराज वगळता कोणाचीच गोलंदाजी भेदक वाटली नाही. सारांश भारताने ही मालिका जिंकली असली तरी संघाच्या सुधारणेला अजून खूप वाव आहे. श्रेयस अय्यर किंवा महम्मद शमी इत्यादींना पुन्हा संघात घ्यावे लागेल. फलंदाजी करू शकणारे गोलंदाजच खेळवायचे हा हट्ट सोडून द्यावा लागेल. मी मधून मधून खेळणार हे बुमरासारख्यांचे लाड बंद करावे लागतील. अन्यथा त्याला सरळ बाहेरचा रस्ता दाखवावा लागेल. शेवटच्या सामन्यासाठी तो संघासोबत उपस्थित नव्हता हे आक्षेपार्ह होते. याउलट बेन स्टोक्स हा जखमी असूनही पूर्ण वेळ संघासोबत होता. या मालिकेत इंग्लंडच्या संघाने बऱ्याचदा रडीचा डाव खेळला. भारताला कमी लेखण्याचा प्रयत्न केला. तो त्यांच्या अंगाशी आला. आपण बाझबॉल नावाचा आक्रमक खेळ करून समोरच्यांची छुट्टी करतो असा इंग्लंडचा गर्व होता. तो भारताने खलास केला हे मात्र चांगले झाले.

## विचार

# चक दे... चक दे इंडिया!

*भारतीय संघाने साहेबांच्या भूमीवर जाऊन ५ कसोटी सामन्यांची मालिका बरोबरीत सोडून इतिहास रचला आहे. इंग्लंडच्या दिग्गज माजी खेळाडूंनी भारत किती फरकाने ही मालिका हरेल, याचे तर्क वितर्क लावले होते. पण भारतीय युवा संघाने ही मालिका बरोबरीत सोडवून त्यांच्या चांगली चपराकच मारली आहे. जरी ही मालिका बरोबरीत सुटली असली तरी हरलेले दोन सामने जिंकण्याची पराकाष्ठा भारतीय संघाने केली होती. त्यामुळे त्या सामन्यांत भारत हरून देखील जिंकला होता. त्यामुळे भारतीय संघाचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.*




इंग्लंड दौऱ्यावर असलेल्या भारतच्या युवा संघाने ५ कसोटी सामन्यांची मालिका २-२ अशी बरोबरीत सोडवून इतिहास रचला. सोमवारी पाचव्या कसोटीच्या पाचव्या दिवसाचा खेळ सुरू झाला तेव्हा भारतीय संघ इंग्लंडचे उरलेले चार फलंदाज बाद करून ही कसोटी जिंकेल, असा विचारही कोणी केला नसेल. कारण इंग्लंडला जिंकायला फक्त ३६ धावा हव्या होत्या. इंग्लंडचे उरलेले फलंदाज या धावा सहज करतील आणि मालिका ३-१ ने जिंकतील, असाच सर्वांचा होरा होता. मात्र, भारतीय खेळाडूंच्या मनात काहीही करून ही कसोटी जिंकायचीच आणि मालिका बरोबरीत सोडवायची, असा विश्वास होता. आणि या विश्वासाच्या जोरावरच भारताने ही कसोटी अवघ्या सहा धावांनी जिंकली आणि सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. भारताचा हा विजय म्हणजे चमत्कारच म्हणावा लागेल. अर्थात चमत्कार करण्याची देखील कला असावी लागते. ही कला भारतीय खेळाडूंनी साध्य केली आणि साहेबांना त्यांच्या देशातच लोळविले. ही मालिका बरोबरीत सुटली असली तरी एकप्रकारे भारताचा हा विजयच आहे.

कारण भारतीय संघ जेव्हा ही मालिका खेळण्यासाठी इंग्लंडच्या भूमीवर उतरला तेव्हा त्यांच्या स्वागताला कोणी हजर नव्हते. सराव सत्रालाही गर्दी नव्हती. कारण सर्वांच्या मते इंग्लडच्या बलाढ्य आणि अनुभवी संघापुढे भारताचा युवा आणि अननुभवी संघ टिकणार नाही. इंग्लडच्या अनेक दिग्गज माजी खेळाडू इंग्लड ही मालिका ४-१ किंवा ५-० अशी जिंकेल, असे छातीठोकपणे सांगत होते. अर्थात त्याला कारणही तसेच होते. रोहित शर्मा, विराट कोहली, रविचंद्रन अश्विन या भारताच्या माजी खेळाडूंनी निवृत्ती घेतली होती. तर पुजारा, रहाणे, मोहम्मद शमी यासारख्या अनुभवी खेळाडूंना या मालिकेत वगळण्यात आले होते. बुमरा, के.एल. राहुल, जडेजा आणि पंत वगळता सर्वच खेळाडू नवखे होते. या मालिकेसाठी शुभमन गिल या युवा खेळाडूची निवड करण्यात आली होती. बुमरा आणि पंत हे जरी अनुभवी असले तरी ते पूर्ण पाच कसोटी खेळणार नव्हते. त्यामुळे

**श्याम ठाणेदार**

ही मालिका इंग्लंड सहज जिंकेल, असा कयास लावला जात होता. मात्र, भारताच्या युवा खेळाडूंनी जबरदस्त कामगिरी करून हा कयास फोल ठरवला. मालिकेच्या पहिल्या कसोटीतच भारताच्या खेळाडूंनी जबरदस्त कामगिरी करत इंग्लंडला इशारा दिला.

वास्तविक पहिलीच कसोटी भारताने जिंकली असती. पण मोक्याच्या क्षणी झेल सोडल्याने ही कसोटी इंग्लंडला जिंकता आली. दुसऱ्या कसोटीत मात्र भारताने पलटवार करत इंग्लडला तब्बल ३३६ धावांनी नामोहरण केले. तिसरी कसोटीही भारतानेच जिंकली असती, मात्र नशीब बलवत्तर होते म्हणून इंग्लडला ही कसोटी अवघ्या २२ धावांनी जिंकता आली. चौथ्या कसोटीत मात्र दोन्ही संघाने तोडीस तोड कामगिरी केल्याने ती कसोटी अनिर्णित राहिली. पाचव्या कसोटीत पुन्हा भारताने जबरदस्त कामगिरी करत विजय मिळवला आणि मालिका बरोबरीत सोडवली. ज्या संघाचा मानहानीकारक पराभव होईल असा अंदाज होता त्याच संघाने मालिका बरोबरीत सोडवत इतिहास घडवला. भारतीय संघाच्या या ऐतिहासिक यशाचे जितके कौतुक करावे तितके कमी आहे. भारताच्या युवा खेळाडूंकडे अनुभवाची कमतरता असली तरी जिंकण्याचा विश्वास होता. याच विश्वासाच्या बळावर भारताच्या या युवा संघाने ही कामगिरी केली. भारताच्या युवा खेळाडूंनी फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाडीवर नेत्रदिपक कामगिरी केली. कर्णधार शुभमन गिल, के.एल.राहुल, यशस्वी जयस्वाल, ऋषभ पंत या खेळाडूंनी संपूर्ण मालिकेत धडाकेबाज फलंदाजी करून इंग्लंडची गोलंदाजी नेस्तनाबूत केली. कर्णधार शुभमन गिलने संपूर्ण मालिकेत सर्वाधिक ७५४ धावा काढून विक्रमी कामगिरी केली. तर, के.एल. राहुलने ५३२ धावा काढल्या. ऋषभ पंत आणि यशस्वी जयस्वाल यांनी ४०० पेक्षा अधिक धावा काढल्या. भारताच्या या युवा फलंदाजांची ही कामगिरी हेवा वाटावी अशीच आहे.

या खेळाडूंनी खोऱ्याने धावा काढल्याने मालिका बरोबरीत सोडवण्यास मोठी मदत झाली. गोलंदाजीतही भारतीय गोलंदाजांनी कमाल केली. बुमरा, सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा, आकाश दीप या वेगवान गोलंदाजांनी कमाल करत इंग्लडच्या फलंदाजांचे कंबरडे मोडले. मोहम्मद सिराजने मालिकेत सर्वाधिक २३ बळी घेतले. बुमरा आणि प्रसिद्ध कृष्णा या तिघांनी ३ कसोटी सामने खेळले आणि त्यांनी प्रत्येकी १४ बळी घेतले. तर, आकाशदीपनेही ३ कसोटीत १३ बळी घेतले. शिवाय शेवटच्या कसोटीत नाईट वॉचमन म्हणून मोक्याच्या क्षणी अर्धशतक झळकावले. मोहम्मद सिराजने तर या मालिकेत अप्रतिम कामगिरी केली. रवींद्र जडेजाने या मालिकेत अष्टपैलू खेळ केला. जडेजाने या मालिकेत ५०० पेक्षा जास्त धावा काढल्या आणि मोक्याच्या क्षणी ७ बळी घेतले. एकूणच भारताच्या खेळाडूंनी फलंदाजी आणि गोलंदाजीत अप्रतिम कामगिरी केली.

भारताचा नवा कर्णधार शुभमन गिलने संघाचे नेतृत्व कुशलतेने केले. कर्णधार म्हणून पहिलीच मालिका खेळत असतानाही तो कुठेही गांगरलेला वाटला नाही. उलट मोक्याच्या क्षणी डोके शांत ठेवून व्यूहरचना रचत त्याने आपल्यातील नेतृत्वगुण दाखवून दिले. कर्णधारपदावर झालेली आपली निवड सार्थ ठरवत त्याने ही मालिका बरोबरीत सोडवली. कर्णधार असूनही त्याने आपल्या फलंदाजीवर परिणाम होऊ दिला नाही. उलट कर्णधार झाल्यावर त्याची बॅट आणखी तळपली. त्याने या मालिकेत सर्वाधिक ७५४ धावा काढून कर्णधार म्हणून एका मालिकेत सर्वाधिक धावा काढण्याचा विक्रम केला. त्याने या मालिकेत ४ शतके झळकावली. तोच या मालिकेचा मालिकावीर ठरला. एकूणच भारताच्या या युवा खेळाडूंनी जबरदस्त कामगिरी करून ही मालिका बरोबरीत सोडवली.

भारताच्या या नव्या युवा संघाची ही कामगिरी कौतुकास्पदच नाही तर अभिमानास्पद आहे. इंग्लड विरुद्धची कसोटी मालिका बरोबरीत सोडवणाऱ्या भारतीय संघाचे मनापासून अभिनंदन! चक दे इंडिया!!

## चर्चा आजची

# अपुऱ्या खताला जबाबदार कोण?






संपूर्ण जगाचा पोशिंदा म्हणून समजल्या जाणाऱ्या बळीराजाला भातासह इतर पिकांसाठी युरिया खत उपलब्ध होत नाही. खतासाठी त्यांना वणवण करावी लागत आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग हतबल झाला आहे. खत निर्मिती करणारा आरसीएफचा कारखाना अलिबागमध्ये असतानादेखील जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खताचा अपुरा पुरवठा होणे ही चिंताजनक बाब आहे. कृषी विभाग व आरसीएफ कंपनी आपली बाजू सावरण्यासाठी एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करीत आहे. मात्र या अपूऱ्या खताला जबाबदार कोण असा प्रश्न निर्माण झाला आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात अवकाळी पावसाने जोरदार सुरुवात केली. गुरांसाठी रचून ठेवलेला भाताचा पेंढा पावसात भिजला. काढणीसाठी तयार झालेले आंबे वाऱ्यामुळे झाडावरून गळून पडले. जिल्ह्यातील अलिबाग, पेण, मुरूड, रोहा, कर्जत, खालापूर, माणगाव, पोलादपूर, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पनवेल, सुधागड या तालुक्यांत पाऊस पडला. एका दिवसात ७२.२ मि.मी. पाऊस पडला असून सरासरी ४.५१ मि.मी. इतकी पावसाची नोंद करण्यात आली आहे. या पावसात उरण, कर्जत, रोहा, मुरूड या तालुक्यातील ३०५ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. त्यामध्ये आंबा आणि भात पिक क्षेत्राचा समावेश आहे. एकूण ९५ गावांना अवकाळी पावसाचा फटका बसला असून ६७५ शेतकरी आर्थिक संकटात सापडला. हा पाऊस जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत सुरू राहिल्याने पेरणी करताना शेतकऱ्यांना अडचणी निर्माण झाल्या. तरीदेखील शेतकऱ्यांनी रो पद्धतीने पेरणी केली. मात्र सतत सुरू राहिलेल्या पावसामुळे पेरणी केलेली भाताची रोपे पाण्यात गेली. त्यामुळे यंदा लावणीसाठी लागणाऱ्या भाताच्या रोपांचा तुटवडा निर्माण झाला. यातून शेतकऱ्यांनी स्वतःला सावरण्याचा प्रयत्न केला. लावणीची कामे होऊन अनेक दिवस उलटून गेली आहेत. मात्र भाताच्या रोपांना वाढ मिळावी, यासाठी युरिया खताची शेतकऱ्यांना गरज निर्माण झाली आहे. जिल्ह्यात दोनशेहून कृषी सेवा केंद्र आहेत. परंतु या सेवा केंद्रामध्ये आरसीएफच्या युरिया खताचा तुटवडा निर्माण झाला आहे. युरिया खत मिळत नसल्याने भात पिक अडचणीत सापडण्याची भिती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

रायगड जिल्ह्याला पूर्वी भाताचे कोठार बोलले जात होते. खत म्हणून शेण, गोवरचा

**प्रमोद जाधव**

वापर केला जात होता. गुरे पाळण्याचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे शेत, गोवर मिळणे कठीण झाले आहे. त्यामुळे पर्याय म्हणून युरिया खताचा वापर केला जात आहे. अलिबागसह रायगड जिल्ह्यात युरिया खताला खुप मागणी आहे.

अलिबागपासून हाकेच्या अंतरावर खत निर्मिती करणारे आरसीएफचे प्रकल्प आहे. या कंपनीकडून करोडो रुपयांचे खतांचे उत्पादन काढले जाते. तरीदेखील अलिबागसह जिल्ह्यातील शेतकऱ्यांना युरिया खत मिळत नाही, ही मोठी चिंतेची बाब आहे. जिल्ह्यामध्ये खत निर्मितीचा कारखाना असला, तरीसुध्दा खताचा तुटवडा, अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. खतासाठी शेतकऱ्यांची धाव धाव सुरू झाली आहे. काही जण ज्यादा दराने खत विकून शेतकऱ्यांची आर्थिक लुट करीत आहेत. याबाबत स्थानिक कृषी कर्मचारी अनभिज्ञ असणे ही मोठी चिंतेची बाब आहे.

आरसीएफकडे मोठ्या प्रमाणात खत पुरवठा आहे. परंतु कृषी विभागाने १० जूलैपासून खताची मागणीच केली नसल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे नक्की याला जबाबदार कोण असा सवाल उपस्थित केला जात आहे. खरीप हंगामात खताचा तुटवडा निर्माण होऊ नये, म्हणून त्याचे नियोजन मार्चपासूनच सुरु जाते. यावर्षी खरीप हंगामात भात बियाणांपासून खत पुरवठ्याचे नियोजन कृषी विभागामार्फत करण्यात आले. जिल्ह्यात ८८ हजार हेक्टर क्षेत्रामध्ये भात लागवड करण्यावर भर देण्याचा उद्देश समोर ठेवण्यात आला. जिल्हास्तरावर बैठक घेऊन नियोजन करण्याच्या सुचना करण्यात आल्या. परंतु चार भिंतीमध्येच हा दिखावा झाल्याचे या प्रकारांमुळे दिसून येत आहे.

खत पुरवठा करण्यामध्ये नियोजन फसले कसे असा सवाल शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसला असताना दुसऱ्या बाजूला कृषी विभाग आरसीएफ कंपनीच्या दुर्लक्षपणामुळे शेत जमीन युरिया खताविना, अशी अवस्था निर्माण झाली आहे. युरिया खताला प्रचंड मागणी असताना खताचा पुरवठा नाही. त्याचा प्रचंड त्रास शेतकऱ्यांना होत आहे. त्यामुळे याकडे प्रशासनाने लक्ष देऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.

## लोकसंसद

### ‘हे संविधान देवते, न्याय दे!’

मुंबईतील श्रद्धा वालकरचे ३५ तुकडे हे उदाहरण ताजे असतांना उत्तरप्रदेशात मुरादाबाद येथील इकरार नावाच्या एका मुसलमान तरुणाने स्वतःचे राज ठाकूर असे खोटे नाव सांगून हिंदु महिलेशी लग्न केले. इकरारने तिच्यावर भावांसहित सामुहिक बलात्कार केला. तर हरदोई (उ.प्र) येथे ‘आय.टी.आय.’मध्ये शिकणाऱ्या एका हिंदु मुलीला तिच्या मुसलमान मैत्रिणीने मैत्रीच्या नावाखाली ‘लव्ह जिहाद’च्या जाळ्यात अडकवून हैदरने बलात्कार केला! तर आज मध्यप्रदेशात लग्नासाठी धर्मपरिवर्तन करण्यास नकार देणाऱ्या ३५ वर्षीय भाग्यश्रीची रईस शेख नामक मुस्लिम इसमाकडून निर्घुण हत्या! बर अनेक पोलीस चौकशीत हे तर ७२ हूर आणि जन्नत मिळण्याचे धडधडीत स्टेटमेंट देतात! अशी फसवी प्रेमप्रकरणे हल्ली भारतात वाढतच चालली आहेत. हे देखील त्यातीलच एक! हे प्रेम नव्हे तर हा ‘अर्बन नक्षलवादा’ प्रमाणे मुस्लिमेत्तर भारतीय युवकांवर चालू असलेला ‘अर्बन जिहादी आतंकवाद’ आहे असे दिसून येते ! हा केवळ भारताच्या संस्कृतीवरच नाही तर युवा-भवितव्यावर तसेच मुस्लिमेत्तर धमतील लोकांच्या वंशवृध्दीवर थेट दहशतवादी हल्ला आहे ! भारतात सध्या ज्याची ‘लव्ह जिहाद’ आणि जगभर ‘रोमियो जिहाद’ म्हणून ज्या हत्या आणि धर्मपरिवर्तनाच्या घटना होत आहेत त्यावरून असे लक्षात येते की ही एक कोरोना पेक्षाही मोठी जागतिक आपत्ति आहे हे येथे ध्यानात घेतले पाहिजे! धर्म परिवर्तन नाही केले म्हणून फसवणूक झालेल्या प्रियसी किंवा प्रियकरची ‘धर्मांध मुसलमानांकडून’ झालेली पीडा, छळ आणि हत्या हा ‘लव्ह जिहाद’ आहे! अशा प्रेमप्रकरणात गैर-मुस्लिम भारतीय स्त्री व पुरुष यांना फसवण्यासाठी मोटार सायकली, गृमिंग यांसाठी आर्थिक पाठिंबा देणाऱ्या व्यवस्थेला समुळ उद्ध्वस्त करण्यासाठी, हिंदूच्या वंशावर उठलेला हा जिहादी आतंकवाद रोखण्यासाठी शासनाला तत्काळ सुबुद्धी होवो. आणि यांवर त्वरीत कठोर असा कायदा होवो, हीच ‘संविधान देवतेला’ प्रार्थना!



**– भूषण वाळणुसकर, डोंबिवली**

## दिनविशेष

# सुषमा स्वराज : भारताच्या माजी परराष्ट्र मंत्री

आपलं वकृत्व, इंग्रजी, हिंदी आणि संस्कृत भाषेवरील प्रभुत्व, प्रभावी नेतृत्व कौशल्य, भाजपचा आक्रमक, पण संयत चेहरा अशी ओळख असलेल्या सुषमा स्वराज यांचा जन्म १४ फेब्रुवारी १९५३ रोजी हरियाणातील अंबाला छावणी परिसरात झाला होता. त्यांचे वडील हरदेव शर्मा हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक होते. अंबाला येथिल सनातन धर्म महाविद्यालातून स्वराज यांनी संस्कृत आणि राज्यशास्त्र विषयात बीए केलं. त्यानंतर पंजाब विद्यापीठातून कायद्याचं शिक्षण घेतलं. पुढे १९७० पासून अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतून त्यांच्या आंदोलनात्मक आणि राजकीय कारकिर्दीला सुरुवात झाली. स्वराज यांनी १९७३ मध्ये सर्वोच्च न्यायालयात आपल्या वकिलीला सुरुवात केली. त्यावेळी जयप्रकाश नारायण यांच्या संपूर्ण क्रांती आंदोलनात त्यांनी सहभाग घेतला. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या काळात लादलेल्या आणीबाणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयात वकिली करणारे स्वराज कौशल यांच्याशी सुषमा यांची ओळख झाली. या ओळखीचं रुपांतर मैत्रीत आणि मैत्रिचं पुढे प्रेमात झालं. १९७५ मध्ये या दोघांनी विवाह केला. स्वराज कौशल हे जॉर्ज फर्नांडिस यांचे सहकारी होते. त्यामुळे सुषमा स्वराजही पुढे फर्नांडिस यांच्या चळवळीची कायदेशीर बाजू सांभाळू लागल्या. इतकंच नाही तर आणीबाणीच्या काळात गाजलेल्या बडोदा डायनाईट प्रकरणात जॉर्ज यांचा बचाव करणाऱ्या वकिली समुहात सुषमा स्वराज यांचाही समावेश होता. पुढे पती स्वराज यांनी आपली वकिली कायम ठेवली तर आणीबाणीनंतर त्या भाजपमध्ये दाखल झाल्या. १९७७ मध्ये वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी त्या हरियाणातून आमदार आणि मंत्रीही बनल्या. पुढे त्यांनी राष्ट्रीय राजकारणात प्रवेश केला आणि कधीही मागे वळून पाहिले नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी डिजिटल इंडिया योजना सुरु केली. मात्र त्याआधीपासूनच मोदींच्या मंत्री मंडळातील दोन खाती आणि त्या खात्यांचे मंत्री ट्विटवरुन लोकांच्या समस्या सोडवतानाचं चित्र २०१९ पर्यंत दिसून आलं. यामधील पहिले नाव म्हणजे तत्कालीन रेल्वेमंत्री सुरेश प्रभू आणि दुसरे नाव म्हणजे परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज. स्वराज या परराष्ट्रखात्याच्या मंत्री असताना ट्विटवरुन लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी त्या लोकप्रिय होत्या. जगभरातील भारतीयांनी त्यांना टॅग करुन केलेल्या ट्विटर त्या उत्तर देत असतं. मोदी सरकारच्या पहिल्या टर्ममध्ये सुषमा स्वराज यांच्यावर परराष्ट्र खात्याची जबाबदारी सोपवण्यात आली होती. त्यांनी परराष्ट्र मंत्रालयासारखं खातं लोकाभिमुख केलं. परराष्ट्र मंत्री असताना स्वराज अवघ्या एका ट्विटच्या माध्यमातून जगाच्या कानाकोपऱ्यात असलेल्या भारतीयांना मोलाची मदत केली. तुम्ही जगात कुठेही असा, तुमचा देश तुमच्या मदतीसाठी तत्पर आहे, अशी भावना स्वराज यांनी परदेशात असलेल्या भारतीयांच्या मनात निर्माण केली होती. इतकंच नाही तर स्वराज यांनी पासपोर्ट लवकर मिळावा म्हणून जी ऑनलाईन सुविधा सुरु केली. तो अगदी महत्वपूर्ण निर्णय ठरला. ज्यामुळे अनेकांचे पासपोर्टच्या अडचणी संपल्या. याच साठी त्यांनी मोबाईल ॲप देखील आणले. सुषमा स्वराज यांनी आजारपणामुळे २०१९ ची निवडणूक न लढण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर त्या सक्रीय राजकारणापासून दूर झाल्या. असं असलं तरी काश्मीरमधील ३७० कलम रद्द केल्यानंतर त्यांनी भाजप सरकारच्या निर्णयाचं स्वागत केलं. ‌हा दिवस या जन्मात पाहायला मिळाला अशी आपली इच्छा होती, तू पूर्ण झालीफ, अशी प्रतिक्रिया स्वराज यांनी दिली होती. पुढे ६ ऑगस्ट २०१९ रोजी वयाच्या ६७ व्या वर्षी दिल्लीतील एम्स रुग्णालयात उपचार सुरु असताना कार्डिॲक अरेस्टमुळे त्यांची प्राणज्योत मालवली. त्यावेळी संपूर्ण भारत शोकाकुल झाला होता.

# शाळांची संचमान्यता अडचणीत

## ● आधार प्रमाणिकरणाअभावी ४३ हजार विद्यार्थी निराधार

**| पुणे | प्रतिनिधी |**

**शालेय शिक्षण विभागाने स्टुडंट्स पोर्टलवर विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणिकरण करण्यासाठी २३ जुलैपर्यंत मुदत दिली होती. मात्र, ही मुदत उलटूनही विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणिकरण अद्याप झालेले नाही. विविध तांत्रिक अडचणी आणि आधार कार्डातील तपशील जुळत नसल्यामुळे शहरातील ४३ हजार ३६८ विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणिकरण बाकी आहे. काही अंशतः अनुदानित आणि स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील शाळांनी अद्यापि विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणिकरण केले नसल्याची माहिती उपलब्ध आकडेवारीवरून दिसून येत आहे. परिणामी, अशा शाळांची संचमान्यता कशी होणार, हा प्रश्न आहे.**




शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांचा लाभज्या विद्यार्थ्यांना दिला जातो, त्यांचे आधार कार्ड अद्ययावत करणे बंधनकारक आहे. त्यासाठी निर्धारित २३ जुलैपर्यंतच्या अंतिम मुदतीमध्ये महापालिका हद्दीतील शाळांमधील भोसरी विभागातील २१ हजार ४२५ आणि आकुर्डी विभागातील २१ हजार ९४३ टक्के विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणिकरणाचे काम झाले आहे. पिंपरी विभागातील ७० टक्के आणि आकुर्डी विभागातील ४४ टक्के शाळांकडून आधार प्रमाणिकरण झाले आहे. विविध तांत्रिक अडचणी आणि आधार कार्डातील तपशील जुळत नसल्याने ४३ हजार ३६८ विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणिकरण बाकी आहे. काही अंशतः अनुदानित आणि स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील शाळांनी अद्यापि विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणिकरण केले नसल्याची माहिती उपलब्ध आकडेवारी दिसून येत आहे. आधार कार्ड अद्ययावत न करणाऱ्या विद्यार्थ्यांना यापुढे अनुदान मिळणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

> विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणिकरण करताना अनेक अडचणी येत आहेत. दिवसातून दोन ते तीनच विद्यार्थ्यांची आधार कार्ड अद्ययावत होत आहेत. विविध तांत्रिक अडचणींमुळे आधार कार्डातील तपशील जुळत नव्हते. त्यामुळे शिक्षक, पालकांसमोरील अडचणींचा डोंगर असताना अनेक शाळांनी प्रयत्न केले. स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील शाळांना आधार प्रमाणिकरण करण्याच्या सूचना केल्या आहेत.
> – संगीता बांगर, प्रशासन अधिकारी शिक्षण विभाग, महापालिका

### मुदतवाढ देऊनही अद्ययावतीकरण बाकी

अनुदानाच्या कक्षेत येणाऱ्या शाळा महाविद्यालयांमध्ये कार्यरत शिक्षकांच्या वेतन अनुदानासाठी संचमान्यता गरजेची आहे. त्या अनुषंगाने प्रक्रिया सुरू केली आहे. अनुदानास पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, शालेय पोषण आहाराबरोबर मोफत पाठ्यपुस्तके व अन्य सरकारी योजनांचा लाभ दिला जातो. त्यामुळे आधार कार्ड २३ जुलैपर्यंत अद्ययावत करणे आवश्यक होते. त्यानंतरच विद्यार्थ्यांना अनुदान वितरित केले जाणार आहे. एनआयसी, पुणे सरल प्रणालीतील स्टुडंट पोर्टलवर नोंदविल्या गेलेल्या विद्यार्थ्यांच्या आधार अद्ययावतीकरणाचे काम वेळोवेळी मुदतवाढ देऊनही पूर्ण झालेले नाही.

### तांत्रिक अडचणी

अनेक पालकांमध्ये आधारविषयी जागृतीचा अभाव दिसून येतो. त्याचबरोबर बऱ्याच पाल्यांचे आधार कार्डच काढणे बाकी आहे. काही मुले स्थलांतरित झाली आहेत. संकेतस्थळ वारंवार होण्याचा प्रकार घडत असल्याने प्रमाणिकरणाच्या प्रक्रियेत अडथळे येतात. अनेक विद्यार्थ्यांच्या नावाच्या स्पेलिंगमध्ये अडचण आहे. या अनेक बाबींमुळे शिक्षकांपर्यंत अद्ययावत माहिती येण्यास अडथळे निर्माण होत आहेत.

---

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

६ ऑगस्ट

१) श्री. विश्वास नामदेव म्हात्रे
मु.हाशिवरे, अलिबाग,
०६-०८-१९३८

२) श्रीम.विजया दामोदर ठोसर
मु.नागाव, अलिबाग,
०६-०८-१९४६

३) श्रीम.प्रभावती घनश्याम पेरेकर
ब्राम्हण आळी, अलिबाग,
०६-०८-१९५३.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

## सुवर्णकण



पैसा हे सर्व सुखाचे माध्यम आहे. या दृढ कल्पनेमुळे माणूस पैशाच्या मागे लागतो त्याचा भ्रमनिरास झाला तरच तो योग्य मार्गाला लागतो नाहीतरी या जन्ममरणाच्या रहाटगाडग्यात कायमच सापडतो.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण.**

## ई-पॉसद्वारे खत विक्री अनिवार्य

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

सर्व किरकोळ रासायनिक खत विक्रेत्यांना आता अनुदानित रासायनिक खतांची विक्री ई-पॉस प्रणालीद्वारे करणे बंधनकारक केले आहे. खतांच्या विक्रीची नोंद तात्काळ आणि अचूक पद्धतीने प्रणालीमध्ये समाविष्ट करणे आवश्यक असून, या नियमांचे पालन न करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई होऊ शकते, असे जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयाकडून सांगण्यात आले.

खत विक्रेत्यांकडे असलेले ई-पॉसमधील खत आणि प्रत्यक्ष गोदामातील खताचा साठा यात कोणतीही



तफावत असू नये. यासाठी रासायनिक खतांच्या विक्रीची नोंद एफएमएस (आयएफएमएस) प्रणालीमध्ये वेळेत भरणे बंधनकारक आहे. या नियमांचे पालन केले जात आहे की नाही, हे तपासण्यासाठी क्षेत्रीयस्तरावर खत निरीक्षकांना नियमित तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### ● नियमांचे पालन न केल्यास कारवाई

ज्या विक्रेत्यांकडे ई-पॉस आणि प्रत्यक्ष साठ्यात फरक आढळेल, त्यांच्या परवान्यावर नियमानुसार कारवाई करण्याच्या सूचना परवाना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. ज्या विक्रेत्यांनी अद्याप नवीन एल एक सिक्युरिटी ई-पॉस मशीनचा वापर सुरू केलेला नाही, त्यांनी १० ऑगस्टपूर्वी कार्यालयाशी संपर्क साधून ती मशीन प्राप्त करून अंमलबजावणी करावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

## 'माधुरी'साठी सरकार कोर्टात

### राजू शेट्टीही पेटाविरोधात आक्रमक

**| कोल्हापूर | प्रतिनिधी |**

माधुरी ऊर्फ महादेवी हत्तीणीला गुजरातमधील वनतारा प्रकल्पात नेण्यात आले. आता महादेवी हत्तीण परत आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. मंगळवारी (दि. ०५) मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थित याबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत सर्वोच्च न्यायालयात पुन्हा याचिका दाखल करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणात यासाठी महाराष्ट्र सरकार पक्षकार होणार असल्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. महादेवी परत यावी, अशी आमची भूमिका असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठकीत सांगितले. दरम्यान, धार्मिक परंपरा मोडून काढण्याचा प्रयत्न पेटा संस्थेने केला असून, वनतारा येथून महादेवीला आम्ही परत आणणारच, असा विश्वास राजू शेट्टी यांनी व्यक्त केला आहे.

दरम्यान, मंत्रालयात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली झालेलया बैठकीस कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांतपाटील, धनंजय महाडिक, धैर्यशील माने, विशाल पाटील हे खासदार, विधान परिषदेचे गटनेते सतेज पाटील, विनय कोरे, अमल महाडीक, विश्वजित कदम, राजेंद्र पाटील-यड्रावकर, अशोक माने, राहुल आवाडे हे आमदार, माजी खासदार राजू शेट्टी, माजी मंत्री प्रकाश आवाडे, अपर मुख्य सचिव (वने), प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन्यजीव), जिल्हाधिकारी अमोल येडगे, जिल्हा पोलिस अधिक्षक योगेशकुमार गुप्ता, भालचंद्र पाटील, सागर शंभुशेटे, आप्पासो भगाटे, सागर पाटील, ॲड. मनोज पाटील उपस्थित होते. कोल्हापूर जिल्ह्यातील नांदणी गावाच्या मठातील माधुरी हत्तीणीला वनतारामध्ये नेण्यात आले आहे. माधुरीला नेल्यामुळे नांदणी गावातील नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. मोर्चे काढत माधुरीला नेऊ नका अशी मागणी नांदणी गावकऱ्यांनी केली होती. मात्र तरीदेखील माधुरी हत्तीणीला वनतारामध्ये नेण्यात आली आहे. धार्मिक परंपरा मोडून काढण्याचा प्रयत्न पेटा संस्थेने केला आहे, असे माजी खासदार राजू शेट्टी यांनी पत्रकारांना सांगितले. तर वनतारा येथून महादेवी आम्ही परत आणणारच, असा विश्वास राजू शेट्टी यांनी यावेळी व्यक्त केला. बैठकीत पेटा ही संस्था आर्थिक अमिष दाखवून वनतारा येथे पाळीव हत्ती देण्याची सुपारी घेतली आहे, असा आरोप करून राजू शेट्टी म्हणाले की, महाराष्ट्र सरकारने ज्या हत्ती वनतारा येथे पाठविण्यात आले आहेत. त्यांची सध्या काय परिस्थिती आहे, याबाबत कोणतीही तपासणी राज्य सरकारने केलेली नाही. दरम्यान, राज्य सरकारने आज बैठक घेऊन सकारात्मकता दाखविली असली तरीही जोपर्यंत माधुरी हत्ती नांदणी मठात परत येणार नाही, तोपर्यंत अंबानी उद्योग समुहाच्या सर्व गोष्टीवर बहिष्कार टाकण्याचे आंदोलन महाराष्ट्रासह कर्नाटक, राजस्थान, मध्यप्रदेश या राज्यात सुरू करणार असल्याचे शेट्टी यांनी सांगितले.

## भोंदू बाबाने डॉक्टरला लुटले

मुंबई : मुंबईच्या कांदिवली भागात डॉक्टर ऋषिकेश म्हात्रे यांचा दवाखाना आहे. ते दंतचिकित्सक आहेत. नुकताच त्यांच्या या दवाखान्यात दोन भोंदू बाबा आले होते. त्यांनी डॉ. ऋषिकेश म्हात्रे यांना संमोहीत करत हातातील सोन्याचा कडा लुटला. ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. या भोंदू बाबांने हातचलाखीने डॉक्टरला संमोहीत करत विश्वासार्हतेचे नाटक केले. आणि त्यांचा मौल्यवान दागिना घेऊन ते पसार झाले. विशेष म्हणजे डॉक्टरांना त्यांच्या कड्याची चोरी झाल्याची जाणीवदेखील काही वेळानंतर झाली. चारकोप पोलीस या भोंदू बाबांचा शोध घेत आहेत. या घटनेमुळे शहरात पुन्हा एकदा अशा संमोहन करणाऱ्या टोळ्यांविषयी भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## दोन तरुण बुडाले

**वसई :** श्रावणी सोमवार निमित्ताने नालासोपारा ते तुंगारेश्वर येथील महादेव मंदिर अशी कावड यात्रा काढण्यात आली होती. यात नालासोपारा येथील संतोष भवन येथे राहणाऱ्या सचिन आणि हिमांशू यांचा ही समावेश होता. प्रवासादरम्यान तुंगारेश्वर येथील नदीच्या ठिकाणी ते विश्रांती साठी थांबले होते. यावेळी सचिन यादव पाण्यात पाय धुण्यासाठी उतरला आणि पाय घसरून नदीत पडला. हिमांशूने त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला, मात्र तो ही पाण्यात बुडाला. ही घटना सोमवारी (दि. ०४) दुपारी साडेतीनच्या सुमारास घडली.

## खेड शहरातील रस्त्यांची दुरवस्था

### मनसेचे पालिकेला निवेदन

**| खेड | प्रतिनिधी |**

खेड शहरातील रस्त्याच्या झालेल्या दुरावस्थेकडे लक्ष वेधण्यासाठी खेड नगरपालिकेचे मुख्याधिकारी महादेव रोडगे यांना सोमवारी (दि. ०४) निवेदन देण्यात आले. नगरपालिका प्रशासनाने यावर लक्ष केंद्रित न केल्यास संबंधित अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यालयात बसून देणार नाही, असा कडक इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून देण्यात आला आहे.

खेड नगरपालिकेच्या प्रशासकीय राजवटीला साडेतीन वर्षे



पूर्ण झाली आहेत; परंतु या साडेतीन वर्षांमध्ये या खेड शहराची बकाल परिस्थिती झाली आहे. याला सर्वस्वी हे नगर प्रशासन जबाबदार आहे. खेड शहरातून जाणार भरणे, साखरोली, वाकवली, दापोली रस्त्याची अवस्था अतिशय दयनीय झाली आहे. खेड शहरातून जाणाऱ्या रस्त्यामध्ये भलेमोठे खड्डे पडले आहेत. या रस्त्याचे ठेकेदार एसएमसी कन्स्ट्रक्शन असल्याचे समजते आहे; परंतु त्यांची काम करण्याची पद्धत अतिशय बोगस असल्यामुळे पावसाळ्यापूर्वी जी काळजी रस्त्याची घ्यायला पाहिजे होती ती न घेतल्यामुळे आज भरणे-खेड रस्ता धोकादायक स्थितीमध्ये आहे.

या प्रसंगी खेड नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष तथा मनसे राज्य सरचिटणीस वैभव खेडेकर यांच्यासह मनसे तालुकाध्यक्ष निलेश बामणे, ऋषीकेश कानडे, भालचंद्र साळवी, गणेश बेलोसे, यांच्यासह महाराष्ट्र सैनिक, कार्यकर्त, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विहिरीत पडून वृद्धेचा मृत्यू

**रत्नागिरी :** लांजा तालुक्यातील गवाणे मावळतवाडी येथील ८० वर्षीय वृद्ध महिलेचा विहिरीत पडून मृत्यू झाल्याची घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली. गवाणे मावळतवाडी येथील गंगा सदू घवाळी (८०) या घरी एकट्याच राहत होत्या. सोमवारी सकाळी शेजारी राहणारी महिला त्यांना न्याहारी देण्यासाठी गेली असता त्यांना आजी घरात दिसल्या नाहीत. त्यांचा शोध घेतला असता विहिरीत त्या पडल्याचे दिसले.

## एसटी महामंडळात नवीन पदभरती

**| नागपूर | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने विविध प्रशिक्षणार्थी पदांसाठी नोकरीची जाहिरात प्रसिद्ध केली आहे. ही भरती नाशिक विभागीय कार्यालयामार्फत जाहीर करण्यात आली. या भरतीसाठी ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने अर्ज करता येतील. या भरती अंतर्गत एकूण ३६७ रिक्त जागा भरल्या जाणार आहेत, ज्यात अभियांत्रिकी पदवीधर, इलेक्ट्रॉनिक्स मॅकेनिक, मॅकेनिक (रेफ्रीजरेशन अँड एअर कंडिशनिंग), मॅकेनिक मोटार व्हेईकल, शिटमेटल वर्कर, वेल्डर (गॅस अँड इलेक्ट्रीक), पेन्टर, मॅकेनिक डिझेल, इलेक्ट्रिशियन, फिटर, टर्नर आणि कारपेंटर यांचा समावेश आहे. या पदांसाठी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ११ ऑगस्ट २०२५ आहे. इच्छुक उमेदवारांचे वय १४ ते ३० वर्षांच्या दरम्यान असणे आवश्यक आहे. सर्वप्रथम इच्छुक उमेदवारांनी http://www.apprenticeshipindia.gov.ळप या अधिकृत वेबसाइटवर जाऊन नोंदणी करणे आवश्यक आहे.

## दामदुप्पट योजनेतून कोट्यवधींची फसवणूक

**| नाशिक | प्रतिनिधी |**

शहर व जिल्ह्यासह राज्यातील मोठ्या शहरांमध्ये अनधिकृतरीत्या सुरू केलेल्या दामदुप्पट योजनेत आर्थिक गुंतवणूक केलेल्यांना संशयितांनी सुमारे एक कोटी रुपयांना गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात पोलिसांनी तीन संशयितांना ताब्यात घेतले.

विकी शिंदे (३१, रा. मालेगाव), संदीप मत्साळकर (रा. इंदिरानगर, नाशिक), विष्णु मुरलीधर पाटील (५०, रा. मालेगाव कॅम्प), प्रमोद बाबूलाल बिल्लाडे ऊर्फ क्षत्रीय (४१, रा. राधे रो-हाउस, राजसारथीमागे, इंदिरानगर,)

### तीन संशयितांना अटक

चेतन महाजन(३६, रा., लोहोणेर, ता. देवळा, जि. नाशिक) अशी संशयितांची नावे आहेत. यातील विष्णू पाटील, प्रमोद बिल्लाडे व चेतन महाजन या तिघांना सायबर पोलिसांनी अटक केली आहे.

संशयितांनी संगनमत करुन 'ओपेन हॅन्डस' हे संकेतस्थळ बनविले होते. या संकेतस्थळाच्या माध्यमातून त्यांनी दामदुप्पट योजनेची माहिती व्हायरल केली. परंतु, ही योजना राबविताना संशयितांनी रिझर्व बँक ऑफ इंडिया किंवा यासाठी आवश्यक असणाऱ्या कोणत्याही शासकीय विभागांची परवानगी घेतली नाही. त्यासंदर्भात संबंधित विभागाकडे नोंदही न करता दामदुप्पट योजना (एमएलएम) सुरू केली होती. संशयितांनी ऑनलाइन ॲपच्या माध्यमातून गुंतवणूकदारांना आकर्षित केले. तसेच, अनेक योजनांतून त्यांनी आर्थिक गुंतवणुकीवर अत्यंत कमी दिवसात दामदुप्पट योजनांची माहिती व्हायरल केली. गुंतवणूकदारांनी केलेल्या गुंतवणुकीवर अवघ्या दहा ते बारा दिवसात दामदुप्पट परताव्याच्या आमिषाला भुलून अनेकांनी १० हजार रुपयांपासून ते लाखो रुपयांपर्यंतची गुंतवणूक केल्याचे समोर आले.

## सुरक्षेसाठी सीसीटीव्हीची संख्या वाढविणार

### ● सुरक्षा समितीच्या पथकाकडून आगारांची तपासणी

**| पुणे | प्रतिनिधी |**

स्वारगेट स्थानकातील अत्याचाराच्या प्रकारानंतर राज्यातील सर्व बसस्थानके आणि परिसरातील सुरेक्षेबाबत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) ठोस उपाययोजना करीत आहे. याचा एक भाग म्हणून 'सीसीटीव्ही'ची संख्या वाढविण्यात येणार आहे.

सुरक्षा समितीच्या पथकातील सदस्यांनी पुणे विभागातील १४ पैकी आठ आगारांची तपासणी केली. सोमवारी शिवाजीनगर व पिंपरी-चिंचवड आगार आणि



दापोडी कार्यशाळेची पाहणी करून 'सीसीटीव्ही' कॅमेरे लावण्याची ठिकाणे ठरविण्यात आली. सुरेक्षेबाबत ठोस उपाययोजना करण्याचा आदेश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे. ४८ बसस्थानकांवर ८४८ सुरक्षारक्षक नेमणे, बस स्थानकांवरील प्रकाशव्यवस्था वाढविणे, स्थानक परिसरात फेरीवाले, खाद्यपदार्थ विक्रेत्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना, बसस्थानक आणि परिसरात 'सीसीटीव्ही' वाढविणे अशा सूचना त्यांनी दिल्या आहेत.

यापूर्वी पुणे स्टेशन, स्वारगेट, तळेगाव दाभाडे, राजगुरुनगर, मंचर आणि भिमाशंकर या स्थानकांची तपासणी झाली. उर्वरित सहा स्थानकांची तपासणी तीन-चार दिवसांत पूर्ण होईल. पथकात विभागीय वाहतूक व्यवस्थापक सचिन शिंदे, सुरक्षा व दक्षता अधिकारी शंकर लादे, लेखाधिकारी रोचन गायधणी, विभागीय स्थापत्य अभियंता राम राशीनकर, यंत्र अभियंता स्मिता कुलकर्णी यांचा समावेश होता.

> एसटी स्थानकांमधील 'सीसीटीव्ही' कॅमेरे वाढविण्यासाठी सर्वेक्षण सुरू आहे. आतापर्यंत पुणे विभागातील आठ स्थानकांचे तपासणी पूर्ण झाली आहे. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी काही ठिकाणी 'सीसीटीव्ही' वाढविण्याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले.
> – सचिन शिंदे, विभागीय वाहतूक व्यवस्थापक, एसटी महामंडळ

## संरक्षण भिंतीला तडे

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कुरधुंडा (ता. संगमेश्वर) येथे उभारलेली संरक्षण भिंत अतिशय धोकादायक बनली असून, तेथील भाग कोसळण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्याची तात्काळ दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांसह प्रवाशांमधून केली जात आहे.

महामार्गावर दोन महिन्यांपूर्वी कुरधुंडा येथील दर्याजवळ उभारलेल्या १०० मीटरहून अधिक लांबीच्या संरक्षण भिंतीला तडे गेलेले आहेत. ती भिंत आता बाहेरच्या दिशेने झुकली आहे. याकडे सार्वजनिक बांधकाम विभागासह ठेकेदारांकडून कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही. त्या



भिंतीवरील तडे दिवसेंदिवस वाढत असून, काही भाग जमिनीकडे झुकला आहे. त्या भिंतीच्या एका बाजूला महामार्गावरील वाहनांची वर्दळ, तर दुसऱ्या बाजूला गाव व शेतजमिनीकडे जाणारा मार्ग आहे. भिंतीचा भाग कोसळून दुर्घटना धाडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या भिंतीची तात्काळ दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांसह प्रवाशांमधून केली जात आहे.

### आबलोली बाजारपेठेत घुमू लागले ताल | वाद्यालयात कारागिरांची लगबग सुरु

## वाद्य दुरुस्तीच्या कामाला वेग

**| चिपळूण | प्रतिनिधी |**

गणेशोत्सव आणि कोकण यांचे अतूट नाते आहे. गणेशोत्सव अवघ्या वीस दिवसांवर येऊन ठेपला असताना कोकणात गणरायाच्या स्वागताच्या तयारी मोठ्या उत्साहात सुरू असल्याचे दिसून येत आहे. गणपतीमध्ये कोकणात आनंदाचे वातावरण असते आणि या आनंदाला द्विगुणीत करण्यासाठी आरत्या, भजन, शक्ती तुऱ्याचे नाच, जाखडी यांसह विविध उत्साहाच्या कलांचे उत्स्फूर्त सादरीकरण आबालवृद्ध करीत असतात. या सर्व कलाविष्कारासाठी महत्त्वपूर्ण साथ असते ती वाद्यांची. सध्या आबलोली बाजारपेठेत अनिल कृष्णा पालशेतकर यांच्या वाद्य निर्मिती आणि दुरुस्तीच्या दुकानात मोठ्या



प्रमाणात वाद्य निर्मिती, दुरुस्तीची लगबग सुरू असल्याचे दिसून येते.

आबलोली बाजारपेठ ही परिसरातील सुमारे वीस-पंचवीस गावांसाठी महत्त्वाची बाजारपेठ म्हणून ओळखली जाते. अनिल कृष्णा पालशेतकर यांच्या वाद्यालयात सध्या पखवाज, नाळ, ढोलकी, ताशा, ढोल, मृदुंग यांची दुरुस्तीची कामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. यांच्याकडे या सर्व प्रकारचे नवीन साहित्य सुद्धा विक्रीला उपलब्ध आहेत. अनिल पालशेतकर यांच्या चार पिढ्या या व्यवसायात असून परंपरेने अनेक वर्षे ही सेवा परिसरातील गणेश भक्तांसाठी देत आहेत.

नवीन वाद्याची पारख आणि दुरुस्त झालेल्या वाद्याची गुणवत्ता तपासून पाहण्यासाठी गणेश भक्त वाद्य वाजवून पाहतात. त्यामुळे बाजारपेठेत ही गाण्याचे आणि वाद्याचे ताल घुमू लागले आहेत. अवघ्या वीस दिवसांवर गणेशोत्सव घेऊन ठेवला असून गणरायाच्या आगमनाची तयारी अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात सुरू असल्याचे चित्र आबलोली बाजारपेठेत पाहायला मिळत आहे.

> सध्याच्या महागाईच्या काळात वाद्य विक्री आणि दुरुस्ती यामध्ये मोठ्या प्रमाणात दर वाढ होत आहे. परंतु, आपल्या ग्राहकांसाठी, गणेश भक्तांसाठी योग्य दरात विक्री आणि दुरुस्ती देण्याचा प्रयत्न असतो. मला या व्यवसायामध्ये माझे आई-वडील, पत्नी, मुले आणि कुटुंबीय यांचे सहकार्य लाभते.
> – अनिल पालशेतकर, वाद्य विक्रेते

## निवडक



### भृगुऋषी गोमाशी येथे वर्षासहल

**पाली/गोमाशी :** संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथील विद्यार्थ्यांची श्रावणी सोमवार निमित्त गोमाशी येथील भृगुऋषी येथे वर्षा सहलीचे आयोजन करण्यात आले होते.दंत कथेनुसार श्रावण मासातील दर सोमवारी गोमाशी येथील भृगुऋषीत भाविक मोठ्या भक्ती भावाने दर्शनासाठी येतात.भृगुऋषीना भाविकांच्या वतीने दूध,दही व नारळाचा नैवेध दाखविण्यात येतो. श्रावणी सोमवार निमित्त नांदगाव विद्यालयातील विद्यार्थ्यांनी नांदगाव विद्यालय ते गोमाशी भृगुऋषी येथे चालत जाऊन वर्षा सहलीचा आनंद लुटला.विद्यार्थ्यांना भृगुऋषी परिसरातील निसर्ग सौंदर्य खूप आवडले.त्यावेळी त्यानी आपल्या शिक्षकांबरोबर फोटोग्राफी केली तसेच विद्यार्थ्यांनी आपापल्या इयत्तेनुसार बसून अंताक्षरी बोलून वर्षा सहलीचा आनंद लुटला.शाळेच्या वतीने उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना खाऊ देण्यात आला.विद्यार्थ्यांनी खाऊ खाल्यानंतर परिसरात पडलेला कचरा जमा करून शिक्षकांच्या मदतीने त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली. यावेळी प्राचार्य बबन पालवे,जेष्ठ शिक्षक अशोक शिंदे,महेंद्र निकुंभ, भूषण सुतार,नागेश सायगावकर, आकाश ठाकूर, स्वाती शिंदे,सोनल ठकोरे, विद्या भिसे,शामल कंबलकर, मनोज शिर्के हे शिक्षक वृंद उपस्थित होते.

### मंगेश राजाराम राऊत यांचे निधन



**सोगाव :** अलिबाग तालुक्यातील मापगाव येथील मंगेश राजाराम राऊत(वय ५९)यांचे रविवार ३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले आह. याबाबत सर्व स्तरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. सतत हसतमुख, मनमिळाऊ व मितभाषी स्वभावाचे तसेच मापगाव येथे राहणारे व चोंढी येथील प्रसिद्ध श्री क्लासेसचे संस्थापक संतोष राऊत यांचे लहान भाऊ असणारे मंगेश राऊत हे गेल्या काही वर्षांपासून वडखळ येथील जेएसडब्ल्यू कंपनीच्या कामगारांना ने - आण करणाऱ्या बसवर चालक म्हणून कार्यरत होते. रविवारी सकाळी त्यांना मापगाव येथे हृदयविकाराचा झटका आला होता, यावेळी त्यांना उपचारासाठी अलिबाग येथील शिंदे हॉस्पिटलमध्ये प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी कामोठे एमजीएम हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते, मात्र उपचारापूर्वीच त्यांचे निधन झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. त्यांच्या आकस्मिक निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात आली. त्यांच्या पार्थिवावर त्याच दिवशी संध्याकाळी साडे सात वाजता मापगाव येथील स्मशानभूमीत मोठ्या शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले, यावेळी नातेवाईक, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर व जेएसडब्लूचे अधिकारी व कर्मचारी तसेच पंचक्रोशीतील सर्व स्तरातील महिला, पुरुष ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, भाऊ, दोन बहिणी, भावजय, पुतण्या असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी मंगळवारी (दि. १२) तर बारावे गुरुवारी (दि. १४ ) मापगाव येथील राहत्या घरी होणार आहेत. कोणत्याही प्रकारचा दुखवटा स्वीकारला जाणार नाही, असे त्यांच्या कुटुंबियांच्या वतीने सांगण्यात आले आहे.




### हिमोग्लोबिन तपासणी शिबीर संपन्न

**खांब :** दिपक नायट्रेट कं.धाटाव व दिपक फाऊंडेशन रोहा यांच्या फिरता दवाखाना यांच्या माध्यमातून तालुक्यातील श्रमिक विद्यालय चिल्हे येथील विद्यार्थी वर्गाची हिमोग्लोबिन तपासणी शिबिर यशस्वीपणे संपन्न करण्यात आला.या हिमोग्लोबिन तपासणी शिबिर प्रसंगी विद्यार्थी वर्गाची आरोग्य तपासणीही करण्यात आली.तसेच उंची व वजन यांचेही मोजमाप करण्यात आले.त्याप्रमाणे उत्तम व सदृढ आरोग्यबाबतही समूपदेशनही करण्यात आले.यावेळी दिपक फाऊंडेशनच्या डॉ. ऐश्वर्या पाटील,काऊन्सलर उत्कर्षा सरलेकर,डाटा एन्ट्री अंकिता ठाकूर,मारूती निगडे, मुख्याध्यापक दिपक जगताप आदी उपस्थित होते.विद्यार्थी वर्गाच्या आरोग्याच्या दृष्टीने दिपक फाऊंडेशन यांच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमाबाबत मुख्याध्यापक दिपक जगताप यांनी या उपक्रमाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Fresh graduates required for the post of office staff in Alibag. For interview call 9923750539, 9422383099
- **ड्रायव्हर पाहिजे.** ऑटोमॅटीक कार ड्रायव्हिंग येणारा ड्रायव्हर पाहिजे, ठिकाण : बामणसुरे, चोंढी. रविवारी सुट्टी. संपर्क :९०४९६५५५२३
- **ऑफीसमध्ये कामाला मुलगी पाहिजे.** पात्रता Bsc, आणि कॉम्प्यूटरची माहिती, वेळ : सकाळी ९ ते सायं. ६-३०, ठिकाण बामणसुरे, चोंढी, पगार : १०,००० महिना, रविवारी सुट्टी. संपर्क :९८२३५८५३२१
- **घर भाड्याने/विकणे आहे.** भाडे १८,०००/- डिपॉजिट ५०,०००/- चेंढरे संपर्क - ९१७५८००४३०
- **'जन्नावार हॉस्पिटल' बायपास रोड** चेंढरे-अलिबाग मध्ये नर्सची जागा (vacancy) आहे. Contact No 7798034509
- **अलिबागमध्ये ब्युटी पार्लर कामासाठी** अनुभवी मुले, मुली पाहिजे. मो. ८१४९८६५६२५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# कासाच्या खडकालगत सुरक्षेचा अभाव



## प्रवासी आणि मच्छिमारांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करण्याची मागणी

**। उरण । वार्ताहर ।**

**१७ जुलै १९४७ ला अरबी समुद्रातील कासाच्या खडका नजीक झालेल्या जगातील सर्वात मोठ्या बोट अपघाताच्या ७८ वर्षांनंतर ही कोणतीही सुरक्षा व्यवस्था नसल्याने आजही या खडका नजीक बोटीचे अपघात होऊ लागले आहेत. त्यामुळे या मार्गाने ये जा करणाऱ्या प्रवास व मच्छिमार बोटींच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात म्हणजे १७ जुलै १९४७ ला मुंबई वरून रेवसला जाणाऱ्या संत रामदास बोटीला झालेल्या अपघातात ७०० पेक्षा अधिक प्रवाशांचा मृत्यू झाला होता. तर २६ जुलै ला याच परिसरात करंजा बंदरात येणाऱ्या मासेमारी बोट भरकटल्याने ती अलिबागच्या किनाऱ्यावर जाऊन दुर्घटनाग्रस्त झाली.**

या बोटीवरील ८ पैकी पाच खलाशी वाचले तर तिघांचा बुडून मृत्यू झाला आहे. त्यानंतर हा या परिसराचा धोका अधिक गंभीर बनला आहे. २६ जुलै रोजी तुळजाई बोट कासा खडकाजवळ उलटून तीन खलाशांचा बळी गेला. मात्र याच ठिकाणी १७ जुलै १९४७ रोजी रामदास बोट दुर्घटनेत तब्बल ७०० प्रवाशांचा बळी गेला होता. आश्चर्य म्हणजे याच खडकाच्या परिसरात आतापर्यंत अनेक लहान मोठ्धा बोट दुर्घटना घडल्या आहेत. त्यामुळे कासाचा खडक बोटींच्या अपघातामुळे ब्लॅक स्पॉट बनला असून उरणच्या समुद्रातील या खडका जवळून जाताना मच्छीमार तसेच प्रवासी बोटींतील प्रवाशांचा अक्षरशः थरकाप उडत आहे.

उरण-रेवसदरम्यानच्या समुद्र खाडीतील कासा खडक मागील ९५ वर्षांपासून मृत्यूचा सापळा बनला आहे. या सागरी मार्गावर प्रवासी वाहतूक करणाऱ्या बोटींना झालेल्या अपघातामुळे शेकडो लोकांना जलसमाधी मिळाल्याने मच्छीमार व सागरी प्रवाशांसाठी हा खडक यमदूत बनला आहे. २६ जुलै रोजी तुळजाई ही मासेमारी बोट डागडुजीसाठी करंजा बंदराकडे निघाली होती. मात्र कासा खडकाजवळ जाताच या बोटीचे इंजिन अचानक बंद पडल्याने बोट सासवण किनाऱ्यावर बुडाली. यात आठपैकी तीन खलाशी बुडाले. त्यामुळे १७ जुलै १९४७ साली याच सागरी मार्गावर घडलेल्या रामदास बोटीच्या अपघाताच्या आठवणी जाग्या झाल्या.

४०६ टन वजनाची असलेली रामदास बोट वादळी वाऱ्याचा सामना करण्यासाठी सुसज्ज होती. मात्र कासा खडकावर आदळल्याने रामदास बोट फुटली. या दुर्घटनेआधी कासा खडक परिसरात ११ नोव्हेंबर १९२७ रोजी एकाच दिवशी एस. एस. जयंती आणि एस. एस. तुकाराम या दोन प्रवासी बोटी बुडाल्या होत्या. या अपघातात जयंती प्रवासी बोटीतील ९६ तर तुकाराम बोटीतील १४३ प्रवाशांपैकी ४७ प्रवाशांना जलसमाधी मिळाल्याचे सांगितले जात आहे. यानंतर मागील ७५ वर्षांत या कासा खडकाजवळ छोट्या मोठ्या बोटींचे अनेक छोटे मोठे अपघात घडले आहेत. यामुळे उरण-रेवस समुद्रातील कासा खडक परिसर मच्छिमार व सागरी प्रवाशांसाठी यमदूत बनला आहे.

उरणच्या समुद्रात घडत नसला तरी कासा खडकाजवळ आतापर्यंत अनेक बोट उलटून शेकडोजणांना आपला जीव गमवावा लागला आहे. या भागात अचानक वातावरण बदलून वादळ निर्माण होत असल्याचे मच्छिमारांचे म्हणणे आहे. १९४७ मध्येही केवळ दहा वर्षे झालेली मजबूत रामदास बोट कासा खडकाजवळ उलटून सातशे लोकांचा बळी गेला होता. त्यामुळे या भागातून प्रवास करताना प्रवासी, पर्यटक तसेच मच्छिमारांना अलिबाग तालुक्यातील खंदेरीनजीक झालेल्या बोट अपघातातील मृत खलाशांच्या कुटुंबियांना मच्छिमार सोसायटीचा आर्थिक मदतीचा हात देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तर, उरणनजीक असलेल्या धोकादायक कासा खडकानजीक वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे या परिसरात सुरक्षा व्यवस्था उभाण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

गेल्या दोन महिन्यांपासून बंदी असलेल्या समुद्रातील खोल मासेमारीला १ ऑगस्टपासून सुरुवात झाली आहे. त्यातच, गेल्या काही दिवसांपूर्वी उरण तालुक्यातील करंजा येथील तुळजाई या मच्छिमार बोटीचा अपघात झाला होता. यामुळे, बोटीवरील तीन तरुण खलाशांचा मृत्यू झाल्याने कुटुंबियांचा आधार हरपला होता. यामुळे, करंजा येथील मच्छिमार सोसायटीमार्फत या कुटुंबियांना आर्थिक मदतीचा हात देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

यामध्ये, राज्यातील सर्वात मोठी असलेल्या करंजा मच्छिमार सोसायटीमध्ये सुमारे ३५० मच्छिमार बोटींची नोंद असून या मच्छीमार सोसायटीमार्फत खलाशी आणि मासेमारी बोटीचा विमा काढण्यात येत असल्याचे सांगण्यात आले आहे.

**उरणनजीकच्या करंजा खाडीत असलेला कासा खडकालगत अनेक अपघात झाले आहेत. यामध्ये, १९४७ साली झालेल्या रामदास बोटीच्या सर्वात मोठ्या अपघातात शेकडो प्रवाशांचा बळी गेला होता. त्यातच, करंजा बंदरात नव्याने सुरू झालेल्या फिशिंग डॉकमुळे अनेक बोटींची वर्दळ वाढली आहे. यामुळे, शासनाने या धोकादायक असलेल्या कासा खडकालगत सुरक्षा उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे करंजा मच्छीमार या संदर्भात सोसायटीमार्फत शासनाकडे पत्र व्यवहार करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.**

### मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत

**सोसायटीमार्फत प्रत्येक मृत खलाशाला किमान तीन लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात येत असून अपघातातील मृतांच्या कुटुंबियांना रोख रक्कम देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे सोसायटीचे अध्यक्ष प्रदीप नाखवा यांनी सांगितले आहे. अपघातग्रस्त तुळजाई बोटीसाठी सुमारे ७ लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्यात येणार आहे. आठवडाभरात नरेश शेलार, मुकेश पाटील आणि धीरज कोळी यांना आर्थिक मदतीचा हात देण्यात येणार आहे.**

## वाकण पुलाजवळ खड्ड्यांचे साम्राज्य

**। सुकेळी । वार्ताहर ।**



वाहतुकीसाठी महत्वाचा समजला जाणारा मुंबई-गोवा महामार्गावरील रस्त्याची अक्षरशः दयणीय अवस्था झाली असतानाच ग्रामीण भागातील वाकण-आमडोशी-रोहा या मार्गावरील आमडोशी येथिल सुप्रीम कंपनीच्या समोरच तसेच वाकण पुलानजिक मोठ्या प्रमाणात रस्त्याची दयणीय अवस्था झाली आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात खड्ड्यांचे साम्राज्य पसरल्यामुळे अपघात वाढलेले दिसुन येत आहेत.

वाकण ते आमडोशी या अंतरामध्ये अनुक्रमे आमडोशी, वांगणी, बाळसई तसेच काही आदिवासी वाड्यांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे वांगणी ग्रामपंचायत हद्दीमध्ये येणाऱ्या आमडोशी गावाजवळच असणाऱ्या सुप्रिम कंपनीमुळे या मार्गावरुन मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. रोहा- धाटावकडे जाणाऱ्या गाड्या सुद्धा याच मार्गावरुन जातात. त्यामुळे या मार्गावरील अनेक ठिकाणच्या रस्त्याची अवस्था ही खराब झालेली आहे.

येथिल सुप्रिम कंपनीच्या समोर तर अक्षरशः खड्ड्यांच्या साम्राज्यासह रसत्याला तळावाचे स्वरुप आले आहे. तर वाकण पुलाजवळील रस्ता पूर्णतः उखडुन मातीचे ढीग साचले आहेत. त्यामुळे रात्रीच्या वेळेस हे मातीचे ढीगारे वाहनचालकांच्या लक्षात येत नसल्यामुळे तसेच सुप्रिम कंपनीसमोरील पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमुळे मोठ्या प्रमाणात अपघात घडत आहेत. त्यामुळे संबंधित बांधकाम खात्याने किंवा सुप्रिम कंपनी व्यवस्थापनाने याबाबतीत योग्य त्या उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी प्रवाशांमधून होत आहे.

## पेट्रोलियम युनियनच्या जनरल सचिवपदी किरीट पाटील

**। उरण । वार्ताहर ।**

पेट्रोलियम युनियनच्या जनरल सेक्रेटरीपदी किरीट पाटील यांची निवड झाल्याबद्दल काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष व कागार नेते महेंद्र घरत यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. किरीट पाटील हे महेंद्र घरत यांचे समर्थक म्हणून ओळखले जात आहेत.

किरीट पाटील हे रायगड जिल्हा इंटकचे अध्यक्ष, एनएमजीकेएस संघटनेचे उपाध्यक्ष व एमजी ग्रुपचे सदस्य म्हणून ते काम पहात आहेत. ते बीपीसीएल कंपनीत कर्मचारी आहेत. त्याठिकाणी पेट्रोलियम युनियन कार्यरत आहे. या युनियनच्या जनरल सेक्रेटरीपदी किरीट पाटील



यांची नियुक्ती करण्यात आली. जनरल सेक्रेटरीपदी निवड होताच त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी नवनिर्वाचित जनरल सेक्रेटरी किरीट पाटील यांचे अभिनंदन केले. युनियनने माझ्यावर जी जबाबदारी सोपविली आहे. ती यशस्वीपणे पार पाडून कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देऊ असा विश्वास नवनिर्वाचित जनरल सेक्रेटरी किरीट पाटील यांनी सांगितले.

## वृक्षारोपणाचा कार्यक्रम साजरा

**। पोयनाड । प्रतिनिधी ।**

पोयनाड विभाच्या परिसरात पोयनाड व चरी यांच्या मंडळ अधिकारी कार्यालयाच्या वतीने वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या अभियानाअंतर्गत यावर्षी राज्यात १० कोटी वृक्ष लागवड करण्यात येणार असल्याची घोषणा शासनाच्या वतीने करण्यात आली.राज्य दहा कोटी वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट शासनाचे आहे.शासनाच्या वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमा मध्ये सहभागी होत मंडळअधिकारी कार्यालय पोयनाड व चरी यांच्या वतीने परिसरात रोपे लावण्यात आली व रोपे जगवण्याचा संकल्प करण्यात आला.

### वरसगांव-भिरा मार्गावरील चिंचवली नजिक कालव्यावरील

## पूल मोजतोय अखेरची घटका

**। कोलाड । वार्ताहर ।**



मुंबई-गोवा महामार्ग ६६ वरुन वरसगांव ते विळा मार्गांवरील चिंचवली गावानाजिक कालव्याचा पूल हा अखेरची घटका मोजत आहे. या पुलाचे संरक्षण कठडे तुटले असुन पुलाला तडा गेल्यामुळे या ठिकाणी मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे या मार्गांवरून प्रवास करणाऱ्या वाहन चालकांसहित प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाला याकडे सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष होताना दिसत आहे.

वरसगांव-भिरा मार्गांवरील चिंचवली गावानाजिक कालव्याच्या पुलाला असणारे संरक्षण कठडे गेली अनेक दिवसापासून तुटून कालव्यात पडले आहेत तर पुलाला तडे गेले आहेत. परंतु त्यावर कोणतेही उपाय योजना करण्यात आलेली नसल्यामुळे प्रवाशी वर्गातून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

वरसगांव-भिरा मार्गांवर विळा भागड येथे पोस्को कंपनी असुन येथे जाणाऱ्या असंख्य अवजड वाहने चिंचवली नजिक असलेल्या कालव्याच्या पुलावरून ये-जा करीत आहेत.

वरसगांव ते विळा मार्गे पुणे जाण्यासाठी हा नजिकचा मार्ग असल्यामुळे या मार्गावर नेहमीच रहदारी दिसून येते. परंतु चिंचवली नजिकच्या असणारा पूल हा अगोदर अरुंद असल्यामुळे एकाच वेळी समोरासमोरील वाहने एकत्र आल्याने फार मोठी समस्या निर्माण होत आहे. तर पुलाचे कठडे तुटल्यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या मार्गांवर २० ते २५ गावांचा समावेश येत असुन या गावातील शाळा,कॉलेजचे विद्यार्थी, तसेच कोलाड बाजारपेठेत जाणारे असंख्य नागरिक मोटार सायकल, थ्री व्हीलर, फोर व्हीलर, एसटी बसने ये-जा करीत असतात. यामुळे या मार्गांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक वाढली असल्यामुळे भरधाव वेगात वाहने चालविण्याच्या नादात कालव्याचे कठडे तुटल्यामुळे एखादे वाहन कालव्याच्या पाण्यात जाण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.यामुळे काही महिन्यांपूर्वी दोन दुचाकीस्वार कालव्यात पडून गंभीर जखमी झाले आहेत.

वरसगांव-भिरा मार्गांवरील चिंचवली नजिक असलेल्या कालव्यावरील पुलाचे संवरक्षण कठडे एक वर्षांपासून तुटले असुन पुलाला तडा गेला यामुळे हा पूल वाहतुकीसाठी धोकादायक बनला आहे. स्थानिक लोकनेते मात्र महाराष्ट्राच्या विकासाच्या वल्गना करीत आहेत. मग गावाकडील विकासाकडे दुर्लक्ष का करीत आहेत. या जीर्ण झालेल्या पुलामुळे मोठा अपघात होऊन कोणाचा नाहक बळी गेल्यानंतर उपाययोजना करणे कोणाच्या कामाची अशी खरमरीत प्रतिक्रिया रायगड जिल्हा एकलव्य आदिवासी सामाजिक विकास संघटना,जिल्हा अध्यक्ष भिवा पवार यांनी दिली.

- **पुलाचे कठडे तुटले, पुलाला गेला तडा**
- **वाहन चालकांसहित प्रवाशांच्या जीवाला वाढला धोका**
- **सार्वजनिक बांधकाम खात्याचे अक्षम्य दुर्लक्ष**

### पूल अपघाताला ठरतोय निमंत्रण

**चिंचवली नजीकचा पूल जीर्ण झाला असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभाग आणि तत्सम विभागांना तातडीने कळविण्यात आले आहे. असे असतानादेखील या पुलाच्या डागडुजीकडे किंवा नव्याने पुलाच्या उभारणीसाठीचा प्रयत्न सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अद्यापही करण्यात आलेला नाही. या अक्षम्य दुर्लक्ष यामुळे या पुलावर अपघाताची शक्यता अधिक असल्याचे समोर येत आहे.**

### पनवेल महापालिकेच्या चार जागा निश्चित | पनवेलकरांना महिनाभर वाट पहावी लागणार

# ई-वाहनांना चार्जिंग स्थानकांची प्रतीक्षा

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेलमध्ये विजेवरील वाहन खरेदी करण्याचे प्रमाण वाढत असले तरी महापालिका प्रशासनाने अजूनही विजेवरील वाहनांसाठी चार्जिंग स्थानक उभारलेले नाही. महापालिकेच्या स्वमालकीच्या चार चार्जिंग स्थानकांसाठी निविदा प्रक्रियाच सुरू आहे. परिणामी या स्थानकांसाठी पनवेलकरांची प्रतीक्षा संपण्याची चिन्हे नाहीत.

महापालिकेच्या सभागृहातील सदस्यांनी चार्जिंग स्थानक उभारणीसाठी ठराव मंजूर केला होता. मात्र त्या ठरावानूसार निविदेला प्रतिसाद न मिळाल्याने महापालिकेने चार ठिकाणी स्वमालकीचे स्थानक उभे करण्याचे धोरण आखले. अजूनही निविदा प्रक्रिया पार पडलेली नाही. त्यानंतर ही स्थानके उभारण्यात येतील. त्यामुळे विज वाहन मालकांना पनवेलमधील महापालिकेच्या चार्जिंग स्थानकासाठी अजून काही महिन्यांची तरी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

पनवेल महापालिकेमध्ये निवडून आलेले सदस्यांनी ई -वाहनांसाठी बांधा वापरा आणि हस्तांतरीत करा या धोरणावर ई -चार्जिंग स्थानक उभारण्याचा निर्णय घेतला होता. खासगी



भागीदारीतून उभारण्यात येणाऱ्या स्थानकांसाठी महापालिका प्रशासनाने दोनवेळा स्वारस्य निविदा मागवल्या, मात्र त्याला प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी ई-वाहनांसाठी महापालिकेचे स्वमालकीचे चार्जिंग स्थानक उभारण्याचा निर्णय़ घेतला.

पनवेलमध्ये दीड हजारांहून अधिक विजेवर धावणाऱ्या मोटारी व पाच हजार दुचाकी आहेत. तीनशेहून अधिक सदनिका असलेल्या गृहनिर्माण सोसायट्यामध्ये विजेवरील वाहनांसाठी ई-चार्जिंगसाठी स्वतंत्र जोडणी देण्याचे निर्देश आहेत. मात्र अनेक गृहनिर्माण सोसायट्यांनी याकडे पाठ फिरवली आहे.

पालिकेने यासाठी चार विविध प्रभाग समितींमध्ये चार वेगवेगळ्या जागांवर चार्जिंग स्थानकांसाठी जागा निश्चित केल्या आहेत.

यामध्ये खारघर येथील लिटील वर्ल्ड मॉल समोर किंवा स्कायवॉकशेजारी, कामोठे येथील उड्डाणपुलालगत, कामोठे वसाहतीमध्ये सेक्टर २१ येथील मैदानाशेजारी आणि वडाळे तलावाशेजारी ही स्थानके उभारण्याच्या हालचाली महापालिकेत सुरू आहे. या स्थानकामध्ये दोन चारचाकी वाहने आणि एक दुचाकी एकाचवेळी उभी करुन चार्जिंग करु शकतील एवढी जागा असणार आहे.

# निर्मला पाटील यांचे निधन

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील मोठे शहापूर येथील निर्मला भानुदास पाटील यांचे शनिवारी (दि.२) निधन झाले. त्या एक आदर्श शिक्षिका होत्या. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी समाजाला दिशा दिली आणि सामाजिक कार्यातही तेवढाच सक्रिय सहभाग घेतला होता. त्यांनी फक्त विद्यार्थ्यांचे शिक्षणच नाही, तर त्यांच्या आयुष्याचे मार्गदर्शन करत एक सुसंस्कारित पिढी घडवली. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना रायगड जिल्हा परिषदेकडून 'आदर्श शिक्षक पुरस्कार' देखील मिळाला आहे. त्यांनी शिक्षणसेवेचा बराचसा काळ वाडगाव येथे घालविला आहे. त्यांनी आपले पती भानुदास पाटील यांच्यासह ज्ञानदानाच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले आहे.



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

जमीन मालक यांचे खाली वर्णन केलेल्या शेतजमिनीचे मालकी हक्क तपासणेकामी प्रस्तुत नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**

**मौजे-दुष्मी, ता. पेण, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | भूधारणा पद्धती | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| ५२ | १ | भोगवटादार वर्ग-१ | १३-४३-०० | १६=५२ |

सदरहू मिळकतीत अन्य कोणाचाही, वारसा हक्क, हिस्सा, खरेदी-विक्री, सामंजस्य करार, हस्तांतरणाचा करार, कुलमुखत्यारपत्र, गहाण, भाडेपट्टा, परवाना, बक्षीस, ताबेकब्जा अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत योग्य त्या प्रमाणित प्रतींसह, सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास, सदरहू मिळकत निर्वेध, निर्विवाद व बोजाविरहीत आहे आणि जमीन मालकांचे मालकी हक्क स्वच्छ व निर्विवाद आहेत व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती संबंधितांनी सोडून दिल्या आहेत. असे गृहित धरण्यात येईल त्या जमीन मालकांवर बंधनकारक राहणार नाहीत, कृपया यांची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०४/०८/२०२५

सही/-
**श्री. जगदीश उरणकर**
ॲडव्होकेट हायकोर्ट
ऑफिस- १०१, आदित्यप्रज्ञा को.ऑप.हौ.सो.
गोखले हॉल शेजारी, पनवेल-४१०२०६
ता. पनवेल, जि. रायगड

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यास येते की, मौजे वाशी, ता. पेण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल त्याचे नमूद विद्यमान मालक वेणुबाई गजानन म्हात्रे व इतर यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./गट नं. /हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| वाशी | १६६/१ | १.३२.८० <br> पो.ख. ०.०२.८० <br> एकूण क्षेत्र १.३५.६० | १६.३७ |

वरील संपूर्ण क्षेत्रापैकी ०.२०.०० हे.आर. इतके क्षेत्र हे आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमूद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारसा हक्क, पोटगी, लिज, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ (सात) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिप : सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण : पेण
दि. ०६/०८/२०२५

सही/-
**ॲड. हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
पेण पोलीस स्टेशन जवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोटआळी पेण मो.नं. ९८२२०३०३८९

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसने कळविण्यात येते खालील वर्णनाची मिळकत तीचे विद्यमान मालक/भोगवटादार यांचेकडून आमचे अशिलांनी श्री.गजानन हनुमंत पाटील आणि श्रीम.शोभना गजानन पाटील यांनी कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालिलप्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजेः कुरकुंडी कोलटेंभी, तालुकाः अलिबाग, जिल्हाः रायगड**

| भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे आर पॉ) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|---|
| वृषाली विवेक सावणेकर | २७५ | २ | ०-०९-५० | ०.२० |

तरी वरिल मिळकती बाबतीत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा-कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, ॲटॅचमेंट, लीएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अथवा प्रत्यक्ष संपर्क करावा. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील आणि वरिल मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

तारीख : ०६/०८/२०२५

**ॲड. अतुल उल्हास तुरकर**
संपर्काकरीता पत्ता मु.भगवती पो-चौल
ता. अलिबाग, जि, रायगड,
मो.क्र.-९०२१८१२८१९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे आंदोशी, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालक संतोष अनंत म्हात्रे, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर. | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| आंदोशी ता. अलिबाग | १५ | जिरायत ०-३४-१० <br> वरकस ०-०५-०० <br> पो.ख. ०-०३-३० <br> एकूण ०-४२-४० | ८.१२ |

वर नमूद संपूर्ण मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापि सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामीनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यु. करार, ताबेकब्जा, वहिवाट, रस्ता वहिवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रारी/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही, वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडून दिला आहे असे समजून, गृहित धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती वा तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ०५/०८/२०२५
मोबा. ९०२८८५१२८०

**ॲड. विराज शरद अंबूकर**
मु. हनुमान वाडी, थेरोंडा, पो. चौल
ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे-माणकिवली, ता. खालापूर, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत व जमीन आमचे अशिल कायमस्वरूपात विकत घेण्याच्या किंवा त्याचा विकास करण्याच्या प्रयोजनार्थ घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-माणकिवली, ता. खालापूर, जि. रायगड**

| कब्जेदाराचे नाव | गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| मोहम्मद शफी मोहम्मद युसुफ पटेल | ८१ | - | ०-५६-१० <br> पो.ख. ०-११-८० <br> ०-६७-९० | ६.१४ |
| | ८५ | - | ०-०५-३० <br> पो.ख. ०-००-३० <br> ०-०५-६० | ०.४७ |
| | ८६ | २ | ०-३४-७० <br> पो.ख. ०-०५-३० <br> ०-४०-०० | २.०२ |

सदरहू जागा, जमीन व मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा-कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून १५ दिवसाचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर, समक्ष वा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे विहीत मुदतीत कोणत्याही हरकती दाखल न झाल्यास वरील मिळकती ह्या निर्वेध व बोजाविरहीत आहेत व हरकत असल्यास ती सोडून दिली आहे असे गृहित धरून आम्ही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करू व विहीत मुदतीच्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीस आम्ही कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०५/०८/२०२५

**ॲड. सुप्रिया नवरीकर-पाटील**
पत्ता : गाळा नं. ७ व ८, तळमजला,
सदाशिव को.ऑप. हौसिंग सोसायटी,
गोदरेज प्लाझा समोर, लोकमान्य टिळक रोड,
पनवेल, जि. रायगड-४१०२०६.
मो. ९८१९०३४१३३.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे अशिल श्री.किरण रामचंद्र थोरवे व सौ.ज्योती किरण थोरवे यांनी खाली वर्णन केलेली जमिनीची मिळकत तिचे विद्यमान मालक व कब्जेदार १) सौ.सुगंधा बाबाजी जाधव उर्फ सौ.सुगंधा सिद्धार्थ मोरे, रा.जांबरुंग, ता.कर्जत, जि. रायगड, पिन कोड ४१०२०१, २) सौ.शोभा बाबाजी जाधव उर्फ सौ.शोभा उर्फ संध्या संतोष केदारी, रा.सावरोली, ता.खालापूर, जि.रायगड, पिन कोड ४१०२०२, यांचेकडून कायम खरेदीखताने विकत घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे रेव्हेन्यू रेकॉर्डप्रमाणे वर्णन येणेप्रमाणे -

**मौजे-तिवरे, ता.कर्जत, जि.रायगड येथील शेतजमिन मिळकत -**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रू.पै. |
|---|---|---|
| ४/२ | एकुण क्षेत्र ०.०९.१० यापैकी सौ.सुगंधा बाबाजी जाधव व सौ. शोभा बाबाजी जाधव यांचे अविभक्त हिश्याचे क्षेत्र | ०.८५ |

आमचे आशिल यांची मौजे तिवरे, ता.कर्जत, जि.रायगड येथे भूमापन क्रमांक व उपविभाग क्र.४/३ ही मिळकत आहे सदर मिळकतीलगतचे क्षेत्र सौ.सुगंधा बाबाजी जाधव व सौ.शोभा बाबाजी जाधव यांचेकडून विक्री घेत आहेत.

येणेप्रमाणे जमिनीची मिळकत तदंगभूत सर्व हक्कहितसंबंध सुद्धा हा या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, खरेदीखत, ताबा, कुळवहिवाट, साठेकरार, मृत्यूपत्रांकित दान, लीज, चार्ज, बोजा, वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदार तर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यांसह लेखी हरकती दाखल कराव्यात मात्र दिलेल्या मुदतीत कुणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहित आहे असे समजून योग्य ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी कळावे.

दिनांक : ०५/०८/ २०२५
पत्ता : पाल टॉवर भिसेगाव
ता.कर्जत जि.रायगड
मो. ९३०७८८५७११.

खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट
**ॲड.यज्ञेश अ.भागवत**
(बी.ई.एल.एल.बी.)

## ग्रुप ग्रामपंचायत कविलवहाळ बुद्रुक

**ता. माणगाव, जि रायगड**

**निविदा सूचना**

ग्रुप ग्रामपंचायत कविलवहाळ बुद्रुक खालील कामाकरिता जास्तीत जास्त नोंदणीकृत, इच्छित ठेकेदारा/पुरवठादार कडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र | कामाचे नाव/वस्तूचे नाव | कामाचे परिमाण (संख्या) | निधीचा स्त्रोत | रक्कम | काम पूर्ण करावयाचा कालावधी | निविदा सादर करणेचा अंतिम तारीख | वेळ | ठिकाण | १% इसारा रक्कम | कोरे निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत हद्दीतील अंगणवाड्यास शौचालय दुरुस्ती करणे | १ | १५ वा वित्त आयोग २०/२१ ग्राप स्तर | ५००००/- | १ वर्ष | ११/०८/२०२५ | सायं ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ५०० | १०० |
| २ | कविलवहाळ व येथे सार्वजनिक कंपोस्ट खड्डे तयार करणे | १ | १५ वा वित्त आयोग २२/२३ ग्राप स्तर | ३०२९४/- | १ वर्ष | ११/०८/२०२५ | सायं ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ३०२ | १०० |
| ३. | कविलवहाळ बु येथे प्लास्टिक संकलन केंद्र बसविणे | १ | १५ वा वित्त आयोग २२/२३ ग्राप स्तर | ३७४०/- | १ वर्ष | ११/०८/२०२५ | सायं ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ३७४ | १०० |
| ४. | कविलवहाळ खुर्द येथे प्लास्टिक संकलन केंद्र बसविणे | १ | १५ वा वित्त आयोग २२/२३ ग्राप स्तर | १८७०/- | १ वर्ष | ११/०८/२०२५ | सायं ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | १८७ | १०० |
| ५ | कविलवहाळ बु येथे सार्वजनिक शोषखड्डे | १ | १५ वा वित्त आयोग २२/२३ ग्राप स्तर | २०१८६/- | १ वर्ष | ११/०८/२०२५ | सायं ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | २०१ | १०० |
| ६ | कविलवहाळ खुर्द येथे सार्वजनिक शोषखड्डे | १ | १५ वा वित्त आयोग २२/२३ ग्राप स्तर | १००९३/- | १ वर्ष | ११/०८/२०२५ | सायं ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | १०० | १०० |
| ७ | सार्वजनिक शौचालय करिता ३०% निधी | १ | १५ वा वित्त आयोग २१/२२ ग्राप स्तर | ९००००/- | १ वर्ष | ११/०८/२०२५ | सायं ५.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ९०० | २०० |

**अटी व शर्ती**

१) प्राप्त निविदा दि.१२/०८/२०२५ रोजी स.ठीक १०.०० वाजता ग्रा.पं. कविलवहाळ बुद्रुक येथे मा.सरपंच यांच्या समक्ष उघडणेत येईल.
२) कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार मा.सरपंच कविलवहाळ बुद्रुक यांनी राखून ठेवला आहे.
३) प्रत्येक देयकाकडून शासन नियमाप्रमाणे रकमा कपात केल्या जातील. मा.उपअभियंता साो.बांधकाम उपविभाग माणगाव यांचेकडील तांत्रिक अधिकारी व पं.स.माणगाव बांधकाम अभियंता तसेच ग्रा.पं.चे मा.सरपंच कविलवहाळ बुद्रुक यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून, काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रा.पं.ने राखून ठेवला आहे.
४) काम अंतिम रित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्या नंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
५) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांच्या निविदांचा विचार केला जाईल.

सही/-
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत**
**कविलवहाळ बुद्रुक**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत**
**कविलवहाळ बुद्रुक**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

**(भारत सरकारचा उपक्रम)**

सादर सेवा

**निविदा अधिसूचना**

उप मुख्य अभियंता (कार्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रणालीद्वारे एकल लिफाफा बोली पद्धतीने खुल्या निविदा मागवित आहे: **कामाचे नाव:** कोलाड येथील रो-रो साठी हाइट गेज आणि काँक्रीट फ्लोअरिंगची दुरुस्ती, हे काम कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील एसएसई/वर्क्स/माणगाव विभागाअंतर्गत, महाराष्ट्र राज्यात करण्यात येणार आहे. **निविदा अधिसूचना क्रमांक : केआर-आरएन-डिव्हायसीईडब्ल्यू-एचटीकेओएल-2025-19 दिनांक: 06/08/2025**, **एकूण अंदाजित खर्च:** ₹7,32,342.16/- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 13/08/2025, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 28/08/2025 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. काम पूर्ण करण्याची मुदत: मॉन्सून वगळता 6 महिने. हस्तलिखित प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील व सहभागासाठी कृपया https://www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. सर्व सुधारणा/परिशिष्टे याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जातील.

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

**(भारत सरकारचा उपक्रम )**

सादर सेवा

**खुली ई-निविदा आमंत्रण सूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने, वरिष्ठ प्रादेशिक अभियंता, रत्नागिरी खालील कामांसाठी खुली ई-निविदा आमंत्रित करीत आहेत.

**क्र. सं.: 1. कामाचे नाव**: एसईएन/चिपळूण विभागाअंतर्गत पुलांवरील ट्रॅकची सखोल तपासणी. **निविदा सूचना क्रमांक: केआर-आरएन-डब्ल्यू-2025-30, दिनांक 05.08.2025. अंदाजे किंमत**: रु. 40,07,955/-. **ईएमडी**: रु. 80,200/-. **निविदा ऑनलाइन सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ**: 28.08.2025 दुपारी 15:00 वाजेपर्यंत.

**क्र. सं.: 2. कामाचे नाव**: एसईएन/चिपळूण विभागाअंतर्गत मड पंपिंग स्थानावरील ट्रॅकची सखोल तपासणी. **निविदा सूचना क्रमांक: केआर-आरएन-डब्ल्यू-2025-28, दिनांक 05.08.2025. अंदाजे किंमत**: रु. 29,20,602/-. **ईएमडी**: रु. 58,400/-. **ऑनलाइन निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ**: 28.08.2025 दुपारी 15.00 वाजेपर्यंत.

अधिक माहितीसाठी प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोले, रत्नागिरी येथे संपर्क साधा. (वेबसाइट: **https://www.ireps.gov.in**)

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत, विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| रामकोठा ता.अलिबाग, जि.रायगड | ९/३ | एकूण ०.१४.४० | १.०६ |
| सोनकोठाखार ता.अलिबाग, जि.रायगड | ८३/१/अ | एकूण ०.८४.५० | २.८२ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध ताबाकब्जा भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य दस्त कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी ह्या नोटीसीच्या तारखेपासून ०७ दिवसाच्या आत प्रथम दर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती दाखल कराव्यात याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतेही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे. असे गृहित धरून माझे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भात नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीच्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीस माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया संबधितांनी नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : ०४/०८/२०२५

सही/-
**ॲड. अमर अशोक घरत**
मु.पो.थळ, पेठ नाका,
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.८८०५०३७४७४

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे बोर्ली, ता. मुरूड, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालक भुपेंद्र अरविंद बंद्री, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| बोर्ली ता.मुरूड, | ८२/ब | जिरायत ०-३२-१० <br> वरकस ०-०७-५५ <br> पो.ख ०-१२-६५ <br> एकुण ०-५२-३० | ६.३० |

वर वर्णन केलेल्या जमिन मिळकती पैकी क्षेत्र ०-२५-५० हे. आर. क्षेत्रापैकी विक्रेता भुपेंद्र अरविंद बंद्री यांचे हिश्याचे ०-१०-०० हे.आर. अविभक्त क्षेत्र या नोटीसीचा विषय आहे.

सदरहू वर्णन केलली मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, ताबेकब्जा वहिवाट, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गृहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.०५/०८/२०२५
मोबा.९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु.बुरूमखाण, पो.वरसोली
ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे हुमगाव, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक निता शिरीष चव्हाण यांचेकडून सदर मिळकती विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २२ | ६ | एकुण क्षेत्र ०-३२-९० पैकी विकत देणार यांचे मालकीचे विक्री केलेले क्षेत्र ०-१६-९० | ४-०० |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०६/०८/२०२५

**ॲड. संदीप हरिश्चंद्र मसणे**
बी.ए.एल.एल.बी.
पत्ता - ब्लॉक नं.१०१, कोर्ट व्ह्यू
बिल्डींग, पहिला मजला, दिवाणी व
फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत,
ता.कर्जत, जि. रायगड
मो.नं ९६०४५४५७७७

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे सालवड, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेल्या जमीन मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक विश्वजीत रामचंद्र संभूस यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे सालवड, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकती**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १२ | ७/ब | ०-३०-८० | ०-२९ |
| १२ | ९ | ०-३६-०० | ०-५२ |
| १२ | १० | ०-२२-०० | ०-३४ |

तरी वरील मिळकतींच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०६/०८/२०२५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे तळवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालक १) श्री. अरविंद रघुनाथ मयेकर, २) श्री. रविशंकर रघुनाथ मयेकर, ३) श्री. लक्ष्मीकांत रघुनाथ मयेकर व ४) श्री. कुलदिप सुशिलकुमार मयेकर यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**परिशिष्ट**

**मौजे तळवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| अनु. नं. | मौजे | गट क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | तळवडे | १००/१ | ०-५४-९० <br> पो.ख. ०-००-७० <br> एकूण ०-५५-६० | १.८६ |
| २) | तळवडे | १००/३ | ९-००-९० <br> पो.ख.०-०१-३० <br> एकूण १-०१-४० <br> (उत्तरेकडील ० हे.१६ आर एवढे क्षेत्र) | ३.३९ |

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ६/८/२०२५

सही/-
**ॲड.गणेश गोविंद पाटील**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, रायगड ४०२ २०१.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाच्या जमिन मिळकतीबाबत विद्यमान मालक यांचेबरोबर चर्चा/वाटाघाटी आमचे अशिल करत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| बोरीस ता.अलिबाग | ५०/२/अ | जिरायत ०-८२-५० <br> पो.ख. ०-०३-६० <br> एकुण ०-८६-१० | ५.३१ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक श्री. बाळकृष्ण सावरमल शहा यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीत असल्याचा व कायदेशीर हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील सदरबाबत कोणताही व्यवहार ठरविणेपुर्वी खातरजमा करणेसाठी ही जाहीर नोटीस देण्यात येत आहे. तरी या जाहीर नोटीसने सर्वांना असे कळविण्यात येते की, वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती ह्या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहेत व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल विद्यमान मालकांबरोबर व्यवहार ठरवतील व त्यानंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण-अलिबाग
दिनांक - ०५/०८/२०२५
मोबा.नं. ९९२२७०७०१२
पक्षकाराचे मान्यतेची स्वाक्षरी
श्री.बाळकृष्ण सावरमल शहा

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु.बुरूमखाण, पो.वरसोली
ता.अलिबाग, जि.रायगड.

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# भारताच्या कसोटी संघात बदल!

## वेस्ट इंडिज विरुद्ध अक्षर पटेलची एन्ट्री, जसप्रीत बुमराह नाही; करुण नायर आऊट

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**भारतीय संघाने शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली इंग्लंड दौरा गाजवला आणि पाच सामन्यांची मालिका २-२ अशी बरोबरीत सोडवली. पाचव्या कसोटीत मोहम्मद सिराज व प्रसिद्ध कृष्णा यांनी गोलंदाजीत कमाल दाखवताना इंग्लंडला अवघ्या ६ धावांनी हार मानण्यास भाग पाडले. रोहित शर्मा, विराट कोहली व आर अश्विन या तीन दिग्गजांच्या निवृत्तीनंतर ही टीम इंडियाची पहिलीच कसोटी मालिका होती. त्यामुळे संघाच्या कामगिरीवर साऱ्यांच्या नजरा खिळल्या होत्या आणि सारेजण खेळ पाहून तृप्त झाले. आता भारताची पुढील कसोटी मालिका घरच्या मैदानावर वेस्ट इंडिजविरुद्ध आहे आणि त्यासाठीच्या संघात काही बदल पाहायला मिळणार आहेत.**




भारतीय संघाची पुढील सामना ९ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या आशिया चषक स्पर्धेत होणार आहे. पण, कसोटी मालिका २ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर हा सामना खेळवला जाणार आहे आणि त्यानंतर १० ऑक्टोबरला दुसरा सामना दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर होईल. शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील टीम इंडियाची ही घरच्या मैदानावरील पहिलीच कसोटी मालिका असणार आहे. जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धा २०२५-२७ च्या फायनलसाठी दावा सांगण्याकरिता ही मालिका अत्यंत महत्त्वाची आहे. भारताला दोन वेळा जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले आहे.

वेस्ट इंडिजविरुद्धच्या कसोटी मालिकेत पुन्हा एकदा जसप्रीत बुमराह, हा केंद्रस्थानी असणार आहे. जसप्रीत हा मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये टीम इंडियाचा महत्त्वाचा खेळाडू आहे. त्यामुळे आशिया चषक स्पर्धेत त्याचे खेळणे निश्चित मानले जात आहे. ही स्पर्धा २८ सप्टेंबरपर्यंत होणार आहे आणि लगेचच २ ऑक्टोबरला कसोटी मालिका सुरू होणार आहे. त्यामुळे जसप्रीतचे कसोटी मालिकेत खेळणे जरा अवघडच मानले जात आहे.

अशा परिस्थितीत मोहम्मद सिराज, आकाश दीप व प्रसिद्ध कृष्णा हे विंडीज विरुद्धच्या मालिकेत प्रमुख भूमिका बजावताना दिसतील. हे तिघेही ट्वेंटी-२० संघाचा भाग नाही. घरच्या मैदानावर मालिका होत असल्याने फिरकी गोलंदाजांवर प्रमुख भीस्त असणार आहे. याचा अर्थ भारताच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये तीन फिरकीपटू दिसतील. या परिस्थितीत अक्षर पटेल याचे पुनरागमन निश्चित आहे. तो फलंदाजीतही प्रभावी ठरलेला आहे आणि संघ व्यवस्थापनाला असेच खेळाडू हवे आहेत. करुण नायरला ८ वर्षानंतर कसोटीत पुनरागमनाची संधी दिली, परंतु त्याला इंग्लंड दौऱ्यावर ८ डावांमध्ये २५.६२ च्या सरासरीने फक्त २०५ धावा करता आल्या. ३३ वर्षीय नायरला वेस्ट इंडिजविरुद्धच्या कसोटी मालिकेत संधी मिळणार नाही. साई सुदर्शन हा प्रमुख स्पर्धक आहे. सर्फराज खान याचाही विचार केला जाऊ शकतो, तर अभिमन्यू इश्वरन याला किमान या मालिकेत संधी मिळेल, अशी अपेक्षा आहे.

**संभाव्य संघ** - शुभमन गिल, यशस्वी जैस्वाल, लोकेश राहुल, साई सुदर्शन, सर्फराज खान, रिषभ पंत, ध्रुव जुरेल, रविंद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, अक्षर पटेल, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज, आकाश दीप, प्रसिद्ध कृष्णा.

# भारतीय संघ डब्ल्यूटीसीच्या फायनलला पोहोचणार?

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघाला जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या मागील दोन पर्वांत अंतिम फेरीत अनुक्रमे न्यूझीलंड व ऑस्ट्रेलियाकडून हार पत्करावी लागली आहे, परंतु जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या नव्या हंगामात भारताची सुरुवात सकारात्मक झाली आहे.

भारताने पाचवी कसोटी जिंकून ४६.६७ टक्क्यांसह तालिकेत तिसऱ्या क्रमांकावर झेप घेतली आहे, तर इंग्लंड ४३.३३ टक्क्यांसह चौथ्या क्रमांकावर आहे. भारतीय संघाने आणखी चांगली कामगिरी केली असती, तर ते ही मालिका सहज जिंकू शकले असते, परंतु त्यांनी मोक्याचे क्षण हेरले नाही. हेडिंग्ले व लॉर्ड्स येथे भारताला थोडक्यात हार मानावी लागली.

पाचवी कसोटी जिंकल्याने भारताची बाजू मजबूत झाली आहे. भारताला आता पुढील दोन कसोटी मालिकांमध्ये वेस्ट इंडिज व दक्षिण आफ्रिका यांचा घरच्या मैदानावर सामना करायचा आहे. प्रत्येकी दोन सामन्यांच्या या मालिका जिंकून भारतीय संघ गुणतालिकेत आणखी मोठी झेप घेऊ शकतो. त्यानंतर भारतीय संघ श्रीलंकेत दोन कसोटी सामन्यांची मालिका, न्यूझीलंडमध्ये दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळणार आहे. हे त्यांच्यासमोरील मोठे आव्हान असणार आहे.

भारताने या मालिका जिंकल्यास त्यांना अंतिम फेरीत जाण्यापासून कुणी अडवू शकत नाही. त्यानंतर भारतीय संघ घरच्या मैदानावर ऑस्ट्रेलियाविरुद्ध पाच सामन्यांची मालिका खेळणार आहे. भारताला फक्त चार सामने परदेशात खेळायचे आहेत आणि बाकी सर्व लढती घरी होणार आहेत. त्यामुळे त्यांचे विजयाचे व जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धा फायनलमध्ये जाण्याची संधी अधिक आहे. पण, तरीही इतर संघांची कामगिरी कशी होते, यावरीह बरेच काही अवलंबून आहे.

# भारतामध्ये प्रथमच तिरंदाजी लीगचा श्रीगणेशा

## नवी दिल्लीत ऑक्टोबर महिन्यात स्पर्धा होण्याची शक्यता

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आता तिरंदाजी या खेळाची लीगही भारतामध्ये खेळवण्यात येणार आहे. भारतीय तिरंदाजी संघटनेकडून सोमवारी याबाबतची माहिती देण्यात आली. भारतामध्ये यावर्षी ऑक्टोबर महिन्यात ११ दिवसांमध्ये तिरंदाजी लीगचे आयोजन करण्यात येणार आहे. नवी दिल्ली येथील यमुना क्रीडा संकुलात ही स्पर्धा पार पडणार आहे. जागतिक तिरंदाजी, आशियाई तिरंदाजी आणि केंद्रीय क्रीडा मंत्रालय यांचे सहकार्य या तिरंदाजी लीगला लाभले आहे

तिरंदाजी लीग ही पुरुष व महिला अशा दोन्ही विभागांत खेळवली जाणार आहे. तसेच रिकर्व्ह व कंपाउंड अशा दोन्ही प्रकारांत तिरंदाजांचा कस लागणार आहे. आगामी तिरंदाजी लीगमुळे भारतासह जगामध्ये या खेळाचा प्रसार व प्रचार होणार आहे. असे संकेत देण्यात आले आहेत.



### तरंदाजी पुढल्या स्तरावर पोहोचणार

भारतीय तिरंदाजी संघटनेचे अध्यक्ष अर्जुन मुंडा याप्रसंगी म्हणाले की, तिरंदाजी लीगच्या आगमनाने खेळाडूंना नवीन व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. यामुळे या देशातील तिरंदाजी हा खेळ पुढल्या स्तरावर पोहोचणार आहे.

### खेळामध्ये सुधारणा होणार

जागतिक तिरंदाजी संघटनेचे सरचिटणीस टॉम डाएलेन म्हणाले की, तिरंदाजी लीगमुळे या खेळावर मोठा प्रभाव पडताना दिसणार आहे. भारतातील तसेच भारताबाहेरील तिरंदाजांसाठी स्पर्धात्मक भावनेचे वातावरण निर्माण होणार आहे. तसेच या स्पर्धेमध्ये खेळून आपल्या खेळामध्ये त्यांना सुधारणा करता येणार आहे. त्यामुळे भविष्यात अव्वल दर्जाचे तिरंदाज म्हणून त्यांना ओळखले जाईल.

### अशी असेल लीग

- सहा फ्रँचायझींचा सहभाग
- भारतासह परदेशी खेळाडूंचा सहभाग
- जगातील अव्वल १० क्रमवारीतील तिरंदाजही खेळणार
- भारतातील दिग्गज खेळाडू खेळणार

# धोनी डिव्हिलियर्सच्या संघाचा कर्णधार

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

एबी डिव्हिलियर्सने आयपीएलमधील सर्वोत्तम ११ खेळाडूंचा संघ निवडला आहे. डिव्हिलियर्सने या संघात धोनीला कर्णधार आणि यष्टीरक्षक म्हणून स्थान दिलं आहे. ७ भारतीय आणि ४ परदेशी खेळाडूंचा या संघात समावेश आहे.

एबी डिव्हिलियर्सने सलामीवीर म्हणून भारताचा रोहित शर्मा आणि ऑस्ट्रेलियाचा मॅथ्यु हेडन यांनी निवड केली. हेडन सुरुवातीच्या काही हंगामांमध्ये आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्सकडून खेळला. रोहित मुंबई इंडियन्सचा महत्त्वाचा भाग असून त्याने कर्णधार म्हणून ५ विजेतीपदं जिंकली आहेत. डिव्हिलियर्सने तिसऱ्या क्रमांकावर त्याचा मित्र आणि बंगळुरू संघातील संघ सहकारी विराट कोहलीची निवड केली आहे. विराट आयपीएलमध्ये सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे.




मधल्या फळीतील फलंदाजांमध्ये डिव्हिलियर्सने भारताचा सध्याचा टी कर्णधार सूर्यकुमार यादवची निवड केली. तसेच पाचव्या क्रमांकावर डिव्हिलियर्सने स्वत:लाच ठेवलं आहे. ६ व्या क्रमांकावर सध्याचा मुंबई इंडियन्सचा कर्णधार आणि भारताचा अष्टपैलू हार्दिक पांड्याची निवड केली आहे. डिव्हिलियर्सने ७ व्या क्रमांकावर आयपीएलमधील सर्वात यशस्वी कर्णधार एमएस धोनीची निवड केली आहे. डिव्हिलियर्सच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये धोनी यष्टीरक्षक आणि कर्णधारही आहे. धोनीच्या नेतृत्वाच चेन्नई सुपर किंग्सने ५ आयपीएल विजेतीपदं जिंकली आहेत. गोलंदाजांमध्ये डिव्हिलियर्सने मुंबई इंडियन्सचे दोन वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि लसिथ मलिंगा यांना स्थान दिलं आहे. त्यांनी मुंबई इंडियन्ससाठी महत्त्वाचे योगदान आयपीएलमध्ये खेळताना दिले आहे.

# काव्याने दोन पाकिस्तानी खेळाडूंना केले करारबद्ध

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

काव्या मारनच्या मालकीच्या नॉर्दर्न सुपरचार्जर्सने मोहम्मद आमीर आणि इमाद वसीम यांना करारबद्ध केलं. भारत-पाकिस्तान दरम्यानच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय वादग्रस्त ठरला आहे. मध्ये युवराजसिंगच्या संघाने पाकिस्तानविरुद्ध न खेळण्याचा निर्णय घेतल्यामुळे हा विषय अधिक चर्चेत आला आहे.

इंडियन प्रीमिअर लीगमधील फ्रँचायझी सनरायझर्स हैदराबाद संघाची मालकिण काव्या मारन हिच्या एका निर्णयाने क्रिकेटविश्वात चर्चा रंगली आहे. भारत-पाकिस्तान यांच्यातील वाढलेला तणाव लक्षात घेता भारताने शेजाऱ्यांसोबत क्रिकेट सामनाही खेळू नये, अशी तीव्र भावना निर्माण झाली आहे. जनभावना लक्षात घेऊनच युवराज सिंगच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या इंडियन चॅम्पियन्स संघाने मध्ये पाकिस्ताविरुद्ध खेळण्यास नकार दिला. असं सर्व घडत असताना काव्या मारनने तिच्या संघात दोन पाकिस्तानी खेळाडूंना करारबद्ध करून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला आहे.

काव्या मारनच्या सन ग्रुपने इंग्लंडमध्ये होणाऱ्या हंड्रेड लीगमध्येही गुंतवणूक केली आहे आणि ही स्पर्धा आजपासून सुरू होत आहे आणि फायनल ३१ ऑगस्टला खेळवली जाणार आहे. पण, स्पर्धा सुरू होण्यापूर्वीच वादाला तोंड फुटले आहे. या लीगमध्ये ८ पैकी चार संघांमध्ये भारतीय मालकांची गुंतवणूक केली आहे.

# गतका मार्शल आर्ट जिल्हास्तरीय निवड स्पर्धा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबागमध्ये गतका असोसिएशन ऑफ रायगड या संघटनेच्या जिल्हास्तरीय निवड चाचणी स्पर्धा झाल्या. उद्घाटन प्रसंगी खेलो इंडिया गतका स्पर्धेमध्ये महाराष्ट्राला पहिले सिल्वर मेडल मिळवून देणाऱ्या श्रमिका पाटील आणि तन्मई पाटील पेदांबे यांच्या शुभहस्ते झाले.

या स्पर्धेमध्ये जिल्हाभरातून शंभरच्या आसपास विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये मुलींची संख्या जास्त होती. बक्षीस समारंभासाठी प्रिझम सामाजिक संस्थेच्या फाउंडेशन अध्यक्षा ज्यांना भारताचे गृहमंत्री यांच्या शुभ हस्ते राष्ट्रीय पुरस्कार मिळालेल्या तपस्वी गोंधळी व जिल्हा संघटनेचे अध्यक्ष संतोष रामचंद्र कवळे, नवगाव तसेच पनवेलचे जिल्हा संघटनेचे उपाध्यक्ष रणजीत मढवी, आंतरराष्ट्रीय खेळाडू रायगड पोलीस नवनाथ दत्तात्रय गावडे, राष्ट्रीय खेळाडू प्रवीण भीमराव खरात, शालेय राज्य मेडलिस्ट हरेश जगदीश पाटील, संघटनच्या सचिव राष्ट्रीय मेडलिस्ट खेळाडू वेदिका कवळे, खजिनदार मुंबई युनिव्हर्सिटी मेडलिस्ट रोहन गुरव, खजिनदार मुंबई युनिव्हर्सिटी बॉक्सिंग मेडलिस्ट सोनू कामी यांच्या शुभहस्ते गौरवण्यात आले.




पंच म्हणून जिज्ञासा पाटील, मानसी पाटील, अक्षय चव्हाण, स्वरा वारगे, किंजल टीवलेकर, मिताली नाईक, जिग्नेश कोळी, दर्पण पाटील, यांनी उत्कृष्ट पंच म्हणून काम केले.या स्पर्धे साठी पालकांची मोठी उपस्थिती होती. या स्पर्धेमध्ये प्रथम येणाऱ्या खेळाडूंची २३ते२४ ऑगस्ट रोजी नाशिक येथील मीनाताई ठाकरे स्टेडियममध्ये महाराष्ट्र राज्य गतका स्पर्धेसाठी निवड झाली.

# आंबव येथे सामूहिक लावणी स्पर्धेचा थरार

**। संगमेश्वर । वृत्तसंस्था ।**

तालुक्यातील आंबवपोंक्षे येथे घेण्यात आलेल्या सामूहिक नांगरणी स्पर्धेत चांगलाच थरार रंगलेला होता. यामध्ये एकावेळी एकच बैलजोडी धावली. प्रथम नांगरणी केली आणि नंतर स्पर्धेचा थरार रंगला. यामध्ये घाटी जोड्यांमध्ये आराध्या किंजळकर (बुरंबाड) आणि गावठी गटामध्ये संदीप सुतार यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. सामूहिक नांगरणी व भातलावणी कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार शेखर निकम यांच्या हस्ते झाले.

तालुक्यातील सरंद येथे प्रथम सामूहिक भातलावणी आणि चिखल स्पर्धेला सुरुवात झाली. ११ वर्षानंतर प्रथमच एकाच वेळी अनेक बैलजोड्या या स्पर्धेत सहभागी झालेल्या होत्या. कमी वेळात अंतर कापण्यासाठी बैलजोड्यांमध्ये चुरस होती. या कार्यक्रमाला आमदार शेखर निकम, उद्योजक अजित मोहिते, बाळू ढवळे, अक्षय चव्हाण, सुशील भायजे, नितीन भोसले, पंकज पुसाळकर, प्रफुल्ल भुवड, राहुल धामापूरकर, आदी ग्रामस्थ उपस्थित होते. सामूहिक चिखलणी स्पर्धेत घाटी गटात आराध्या किंजळकर, संजय वामन सावंत, सुजल संदीप पिलणकर, राहुल बोल्ये, संदीप बाळू सुतार, देवजी भायजे, श्री मानोबा यांची पहिल्या दहामध्ये नोंद झाली. तर गावठी गटामध्ये संदीप सुतार, संबा काटोकारी, संजय लांडगे, भैरी चंडिका प्रसन्न, गणेश सुनील येलोंडे, मन्या देसाई, जय संबा, महाकाली प्रसन्न, जयदेव धामणाक, गंगोबा प्रसन्न यांच्या बैलजोड्या पहिल्या दहामध्ये नोंदल्या गेल्या आहेत.

## सुब्रतो मुखर्जी करंडक फुटबॉल स्पर्धा

## अंतिम सामन्यात पहावयास मिळाली चुरस

# महाराष्ट्र हायस्कूलची पन्हाळ्याच्या संजीवनवर मात

**। सातारा । वृत्तसंस्था ।**

शिवराज तावडेने नोंदविलेल्या गोलमुळे कोल्हापूरच्या महाराष्ट्र हायस्कूलने पन्हाळा येथील संजीवन विद्यालयावर १-० असा विजय मिळवीत कोल्हापूर विभागीय सुब्रतो मुखर्जी करंडक फुटबॉल स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. सातारा जिल्हा क्रीडा परिषद आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या वतीने येथील श्रीमंत छत्रपती शाहू जिल्हा क्रीडा संकुलात १५ वर्षांखालील गटाचे सामने नुकतेच झाले.

स्पर्धेतील अंतिम सामन्यात महाराष्ट्र हायस्कूलने संजीवन विद्यालयावर १-० ने विजय मिळविला. उपांत्य फेरीत महाराष्ट्र हायस्कूलने विटा येथील भारती विद्यापीठ इंग्लिश मीडियम स्कूलवर ३-० असा विजय मिळविला. महाराष्ट्र हायस्कूलच्या शिवराज तावडे, श्रेयस पवार, यज्ञेश पाटील यांनी प्रत्येकी एक गोल नोंदविला. दुसऱ्या उपांत्य सामन्यात संजीवनने अंबोलीतील सिंधुदुर्ग सैनिक स्कूल व ज्युनिअर कॉलेजचा २-० असा पराभव केला. संजीवनच्या धीरज कुरबट्टी, व्ही. देशपांडे यांनी प्रत्येकी एक गोल नोंदविला. स्पर्धेतील तृतीय स्थान सिंधुदुर्ग सैनिक स्कूल व ज्युनिअर कॉलेजने भारती विद्यापीठ इंग्लिश मीडियम स्कूलचा टाय ब्रेकवर ४-१ असा पराभव करीत पटकाविले. निर्धारित वेळेत दोन्ही संघांचे १-१ असे गुण झाले होते.




तत्पूर्वीच्या सामन्यांमध्ये सिंधुदुर्ग सैनिक स्कूलने रत्नागिरीच्या सेंट थॉमस स्कूलचा ६-० असा पराभव केला. यामध्ये आर्यन वारेकरने दोन, आर्यन शेडगे, रुद्र आपटे, अथर्व कांबळे, जय थोरे यांनी प्रत्येकी एक गोल नोंदविला. संजीवन विद्यालयाने सांगलीच्या पोद्दार इंटरनॅशनल स्कूलवर २-० अशी मात केली. अधिराज जाधव आणि व्ही. देशपांडे यांनी एक गोल केला. महाराष्ट्र हायस्कूलने साताऱ्याच्या के. एस. डी. शानभाग स्कूलचा ५-० असा विजय मिळविला. यामध्ये शिवराज तावडेने दोन, पृथ्वीज बागडेकर, हर्षवर्धन खवरे, राजवीर खराडे यांनी प्रत्येकी एक गोल नोंदविला.

विजेत्या महाराष्ट्र हायस्कूल संघात सक्षम साळोखे, साईराज सुतार, आर्यन साठे, वीरेन पाटील, वेदांत साळोखे, राजवीर खराडे, शिवराज तावडे, प्रथमेश बागडीकर, श्रीरंग प्रभू, हर्षवर्धन खवरे, श्रेयस पवार, आयान मस्तानवाले, शार्दूल ढोक, विराज साळवी, सोहम शिंत्रे, यज्ञेश पाटील यांचा समावेश होता. या संघास क्रीडा शिक्षक प्रदीप साळोखे, व्ही. एस. पाटील, मार्गदर्शक संतोष पवार, शरद मेढे, सूर्यजित घोरपडे यांची साथ लाभली. स्पर्धेत साताऱ्यासह कोल्हापूर महापालिका, कोल्हापूर जिल्हा, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सांगली, सांगली महापालिका, तसेच इचलकरंजी महापालिका या संघांचा सहभाग होता. या स्पर्धेचे आयोजन राज्य फुटबॉल क्रीडा मार्गदर्शक सुमीत पाटील यांनी केले. स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा क्रीडा अधिकारी नितीन तारळकर, शिवछत्रपती पुरस्कार विजेते शिवाजी पाटील, सातारा जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे सचिव प्रा. शिवराज गायकवाड, कोल्हापूर महापालिकेचे क्रीडा निरीक्षक सचिन पांडव यांच्या उपस्थितीत झाले. या वेळी कोल्हापूर विभागीय शारीरिक शिक्षक महासंघाचे अध्यक्ष आर. वाय. जाधव, सहसचिव राजेंद्र माने, सातारा तालुका संघटक जितेंद्र देवकर आदी उपस्थित होते.

हाशिम अब्दुलकरीम मुल्ला
तेराव्या वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
जन्मदिनांक : ६/८/२०१२




मु. सोगाव, पो. मापगाव,
ता. अलिबाग, जि. रायगड

शुभेच्छुक
दादा, दादी, अब्बा, अम्मी, चाचा, चाची, हुमेरा, हुझेफा, हबीबा, अर्श, मसिरा, उम्मेहानी, उमर, मरियम, फाईजा, दानिश, अरहम, शेरखान, हामजा

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)